दैनिक

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

dailyglobalbharat@gmail.com

# ग्लोबल भारत

संपादक - शरद खेमचंद अडागळे

www.globalbharatlive.com

❑ औरंगाबाद ❑ वर्ष ५ वे ❑ अंक २८ वा ❑ शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर २०२४ ❑ पाने ८ ❑ मुल्य ५ रू


# नागरिकता अधिनियमाच्या कलम ६ए ची वैधता कायम; सुप्रीम कोर्टाचा फैसला

नवी दिल्ली दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सुप्रीम कोर्टाने गुरुवारी एक महत्त्वाचा फैसला सुनावला. नागरिकता अधिनियमाच्या कलम ६ए ची वैधता कायम ठेवण्याचा मोठा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. या ताज्या निर्णयामुळे सरकारी पक्षाची बाजू मजबूत झाल्याचे मानल्या जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने कलम ६ए ची वैधता कायम ठेवली, जी १९८५ मध्ये आसाम करारानुसार सादर करण्यात आली होती. त्यानुसार, हे कलम मार्च १९७१ पूर्वी भारतात प्रवेश करणाऱ्या बांगलादेशातील प्रवाशांना भारतीय नागरिकत्व देण्यापासून रोखते. सर्वोच्च न्यायालयाने ४-१ अशा बहुमताने हे कलम कायम ठेवले. केवळ न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला यांनी या मुद्दावर असहमती दिली. गेल्या वर्षी १२ डिसेंबर रोजी सुप्रीम कोर्टाने या प्रकरणावर निकाल राखून ठेवला होता.

या निर्णयामुळे १९७१ मध्ये भारतात आलेल्या हिंदू आणि मुस्लिम निर्वासितांना भारतीय नागरिकत्व मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने बहुमताने नागरिकता कायदा कलम ६ए वैध ठरवले. तर न्यायमूर्ती पारदीवाला यांनी कायद्यातील सुधारणा अवैध ठरवली. म्हणजे १ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७१ या दरम्यान जे नागरिक बांगलादेशातून भारतात आले त्यांच्या नागरिकतेला आता धोका नाही. आकडेवारीनुसार, आसामध्ये ४० लाख अवैध स्थलांतरीत नागरिक आहेत. तर पश्चिम बंगालमध्ये हीच संख्या ५७ लाखांच्या घरात आहे. आसाममधील कमी स्थलांतरीत संख्या पाहता या स्थलांतरीतांसाठी एक निश्चित कालमर्यादा कायद्यान्वये ठरवणे आवश्यक होते. या निवाड्यानुसार, ही कट ऑफ डेट आता २५ मार्च १९७१ अशी ठरवण्यात आली आहे. त्यानुसार आता सरकार पुढील कारवाईसाठी मोकळे झाले आहे. या निकालाचा काय परिणाम होणार याची लागलीच चर्चा सुरू झाली आहे. या निकालानुसार आता १९८५ मधील आसाम रेकॉर्ड आणि नागरिकता कायदाचे कलम ६ ला सर्वोच्च न्यायालयाने ४:१ अशा बहुमताने योग्य ठरवले आहे. त्यानुसार, १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ पर्यंत पूर्व पाकिस्तानातून (आताचे बांगलादेश) आसाममध्ये जे निर्वासित आले आहेत, त्यांची नागरिकता कायम असेल. पण त्यानंतर आलेल्या नागरिकांना कायदेशीर मान्यता नसेल. ते अवैध नागरिक ठरतील.

नागरिकता कायदा कलम ६ए अवैध असल्याचे याचिकेत म्हटले होते. हे कलम भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ६ आणि ७ तुलनेत नागरिकतेसाठी वेगवेगळी तारीख निश्चित करत असल्याचा युक्तीवाद त्यासाठी करण्यात आला होता. कोर्टाच्या निर्णयानंतर भारतात राहून भारताविरोधी कारवाया करणाऱ्या आणि त्यांना मतदानासाठी व्होट बँक म्हणून वापर करणाऱ्यांना मोठा झटका बसला आहे. आता आधार कार्डवरील तारखा अपडेट करणाऱ्यांवर केंद्र सरकारला लक्ष ठेवावे लागणार आहे.




## नायब सिंह सैनी यांनी घेतली हरयाणाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ

चंदीगड दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- हरयाणामध्ये नवे सरकार स्थापन झाले आहे. नायब सिंह सैनी हे पुन्हा हरयाणाच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहे. गुरुवारी नायब सिंह सैनी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पंचकुला येथील दशहरा मैदानात हा शपथविधीचा कार्यक्रम झाला. सैनी यांच्या शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह, जे. पी. नड्डा यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित होते. याशिवाय, भाजपाशासित राज्यांचे अनेक मुख्यमंत्रीही या सोहळ्याला उपस्थित होते.

नायब सिंह सैनी यांच्यासह १४ आमदारांनी कॅबिनेट आणि राज्यमंत्रीपदाची शपथ घेतली. अनिल विज यांनी मंत्रीपदाची दुसऱ्यांदा शपथ घेतली. तसेच, यावेळी दोन महिला आमदारांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली. केंद्रीय मंत्री इंद्रजीत राव सिंह यांची मुलगी आरती राव आणि माजी मुख्यमंत्री चौधरी बन्सीलाल यांची नात व तोशाम मतदारसंघाच्या आमदार श्रुती चौधरी यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली.

अनिल विज, कृष्ण लाल पंवार, विपुल गोयल, राव नरवीर सिंह, महिपाल ढांडा, श्रुति चौधरी, अरविंद शर्मा, श्याम सिंह राणा, रणबीर गंगवा, कृष्ण बेदी, गौरव गौतम, आरती राव, राजेश नागर यांना हरयाणा सरकारच्या नवीन मंत्रिमंडळात स्थान मिळाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, हरयाणात गेली १० वर्षे सत्तेत असलेल्या भाजपने यावेळी पूर्ण बहुमताने सरकार स्थापन केले आहे. भाजपने ४८ जागा जिंकल्या आहेत, तर काँग्रेसने ३७ जागा जिंकल्या आहेत.याशिवाय, दोन जागा इंडियन नॅशनल लोकदलाच्या खात्यात गेल्या आहेत.

## केंद्राने २ महिन्यांत जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा, सर्वोच्च न्यायालयात याचिका

नवी दिल्ली दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-काही दिवसांपूर्वीच जम्मू-काश्मीरच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या अन् राज्यात नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वातील सरकारही स्थापन झाले. त्यानंतर आता जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयानेही सहमती दर्शवली आहे. सर्वोच्च न्यायालय जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याच्या मागणीवर लवकरच सुनावणी घेणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात शांततेत निवडणुका पार पडल्याचे म्हटले आहे. त्यामुळेच आता राज्याचा दर्जा देण्यास विलंब होता कामा नये, अशी मागणीही करण्यात आली आहे.

काश्मीरमधील शिक्षक जहूर अहमद भट आणि समाजसेवक खुर्शीद मलिक यांनी ही याचिका दाखल केली आहे. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या निवेदनाचा दाखला त्यांनी दिला आहे. कलम ३७० प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान केंद्राच्या वतीने सॉलिसिटर (पान ४ वर)

## मविआत २६० जागांचा तिढा सुटला; २८ जागांवर प्रचंड रस्सीखेच

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर जागावाटपाबाबत महाविकास आघाडीची सातत्याने बैठक सुरू आहे. मुंबईच्या सोफिटेल हॉटेलला सुरू असलेल्या मविआ नेत्यांच्या बैठकीत आतापर्यंत २६० जागांचा तिढा सुटलेला आहे. उर्वरित २८ जागांवर तिन्ही पक्षांमध्ये प्रचंड रस्सीखेच सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. मविआची १-२ दिवसांत उमेदवारांची यादी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, आजच्या बैठकीपूर्वी मविआत २०० जागांवर एकमत झालं होते, विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारांना अर्ज भरण्याची मुदत आहे. त्यामुळे तिन्ही पक्षातील जागावाटप लवकर सुटावे यासाठी सकाळपासून मविआ नेते बैठकीला बसले आहेत. या बैठकीत संजय राऊत, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, सतेज पाटील आणि इतर नेते उपस्थित आहेत. त्यात आतापर्यंत २६० जागांवर एकमत झाल्याचं सांगण्यात आले आहे.

महाविकास आघाडीतकाँग्रेस सर्वाधिक जागा लढण्याची शक्यता आहे. त्यानंतर ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला जागा दिल्या जातील. जागावाटपात काही जागांची अदलाबदल केली गेली आहे. त्यात मुंबईतील वांद्रे पूर्व मतदारसंघ जिथे मागील निवडणुकीत काँग्रेसचा आमदार निवडून आला होता ही जागा आता काँग्रेसकडून ठाकरे गटाला सोडण्यात आली आहे. भाजपाला आणि महायुती सरकारला सत्तेतून बाहेर काढायचे असा चंग मविआने घेतला आहे. त्यामुळे जागावाटपात तिन्ही पक्षांनी काही जागांवर सामंजस्याची भूमिका घेतली आहे.

आजच्या बैठकीत मुंबईतील ३६ पैकी ३३ जागांवर एकमत झाल्याची माहिती आहे. त्यात काँग्रेस १५, ठाकरेसेना १८ आणि राष्ट्रवादी २ आणि समाजवादी पार्टीला १ जागा देण्यावर सहमती झाली आहे. त्याशिवाय कुर्ला, भायखळा आणि अणुशक्तीनगर या जागांवर अद्याप पेच आहे. आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत महाविकास आघाडीचं जागावाटप जाहीर होऊ शकते असं विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले होते. काँग्रेसची विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांची पहिली यादी २० ऑक्टोबरला येणार आहे. ८४ जागांबाबत उमेदवारी निश्चित झाली असून २० तारखेला पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार आहे. त्याचदिवशी उमेदवारांची यादी जाहीर केली जाऊ शकते.

## आपचा महाराष्ट्रात विधानसभा न लढवण्याचा निर्णय

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- दिल्लीतील सत्ताधारी आम आदमी पार्टीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मैदानातून अंग काढून घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. यामुळे विरोधी पक्षांच्या मतांची विभागणी टळून राज्यातील महाविकास आघाडीला मोठा फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आम आदमी पार्टीने हरियाणा विधानसभा निवडणूक स्वबळावर लढली होती. त्याचा थेट फटका काँग्रेसला बसून भाजपचा मोठा फायदा झाला होता. याचे विरोधकांच्या इंडिया आघाडीत तीव्र पडसाद उमटले होते. त्यामुळे आपने महाराष्ट्र व झारखंड विधानसभा निवडणुकीत सावध भूमिका घेत या दोन्ही राज्यांतील निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या दोन्ही राज्यांच्या निवडणुकीत आम आदमी पार्टी इंडिया आघाडीला पाठिंबा देईल. आपच्या या भूमिकेमुळे विरोधकांच्या मतांची विभागणी टळून त्याचा थेट फटका भाजप पर्यायाने महायुतीला बसण्याची शक्यता आहे.

## तिसरी आघाडी १५० जागा लढणार, शिंदे-फडणवीसांविरुद्ध बच्चू कडू भिडणार; शरद पवारांवरही हल्लाबोल



पुणे दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पुण्यात आज परिवर्तन महाशक्तीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित होते. या बैठकीत १५० जागाबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच इतर जागांवरचा निर्णय देखील घेण्यात येणार आहे. बरेच लोक आमच्याकडे येण्यास इच्छुक असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी दिली आहे. एकनाथ शिंदे असो की देवेंद्र फडणीस यांच्या विरोधात देखील उमेदवार देणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, मनोज तरंगे पाटील यांच्याशी देखील आमचं बोलणं सुरु आहे. ते आमच्या सोबत येतील असे प्रयत्न सुरु असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी दिली आहे. तसेच महादेव जानकर देखील आमच्यासोबत येतील असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला आहे.

सामान्य माणसाला आपलं (पान ४ वर)

## बाबा सिद्दिकी हत्या प्रकरण: शुभम लोणकर अजूनही सापडेना; लुकआऊट नोटीस जारी!

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या बाबा सिद्दीकी यांच्या हत्याप्रकरणातील संशयित आरोपी शुभम लोणकर हा अद्यापही फरार आहे. त्याचा भाऊ प्रवीण लोणकर राहत्या घरातून अटक केली असली तरीही शुभम लोणकर, शिवा गौतम आणि मोहम्मद झिशान अख्तर या तिघांच्या शोधासाठी मुंबई पोलिसांनी १५ पथके तैनात करण्यात आली आहेत. दरम्यान, शुभम लोणकरसाठी लुक आऊट नोटीस जारी करण्यात आली आहे. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

गोळीबार करणाऱ्यांपैकी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह या दोघांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती. तसेच त्यांना मदत करणाऱ्या प्रवीण लोणकर याला गुन्हे शाखेने पुण्यातून अटक केली होती. याप्रकरणी गोळीबार करणारा शिव कुमार ऊर्फ शिवा गौतम याच्यासह आरोपींना मदत करणारा मोहम्मद झिशान अख्तर व कटात सहभागी शुभम लोणकर यांचा शोध सुरू असून त्यांना पकडण्यासाठी मुंबई पोलिसांनी १५ पथके तैनात केली आहेत. १२ ऑक्टोबर रोजी शनिवारी रात्री (पान ४ वर)

## काँग्रेसकडून नांदेड लोकसभेसाठी रविंद्र चव्हाण यांना उमेदवारी

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर नांदेडमधील पोटनिवडणुकांची घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केली आहे. राज्यातील विधानसभेसाठी एकाच टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्याचप्रमाणे नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी देखील २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून काँग्रेसकडून उमेदवाराची घोषणा करण्यात आली आहे. काँग्रेसने अधिकृतपणे परिपत्रक जारी करत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी रविंद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर केली आहे. रविंद्र चव्हाण हे नांदडचे दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांचे सुपुत्र आहेत. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी वसंत चव्हाण यांचे निधन झाल्यामुळे येथील जागेवर पोटनिवडणूक घेण्यात येत आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गेल्याच महिन्यात महाराष्ट्र दौरा केला होता, त्यावेळी नांदेडमध्ये दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली होती. त्याचवेळी, येथील पोटनिवडणुकीतसाठी रविंद्र चव्हाण यांनाच उमेदवारी देण्यात येईल, असे त्यांच्याकडून सांगण्यात आलं होतं. आता, काँग्रेस सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांच्या सहीने पत्र जारी करण्यात आले असून रविंद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. यासह, मेघालय येथील विधानपरिषद निवडणुकीसाठी जिंगजँक मरक यांना संधी देण्यात आली आहे. काँग्रेसकडून या २ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे, आता नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी भाजप महायुतीकडून कोणाला उमेदवारी देण्यात येईल, याची चर्चा राजकीय वर्तुळात असून अनेकांना उत्सुकता लागून आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा प्रतापराव चिखलीकर यांना पराभवाची धूळ चारत नांदेड जिल्ह्यातील अशोक चव्हाण (पान ४ वर)

## काँग्रेसची पहिली यादी २० ऑक्टोबरला; विजय वडेट्टीवारांची माहिती

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाविकास आघाडीचे २१६ जागांचे वाटप पूर्ण झाले असून उर्वरित जागांचे वाटप आज संपेल. २० तारखेला काँग्रेसची पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे, असे राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

दरम्यान विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, २१६ पैकी ८४ जागा या काँग्रेसच्या वाट्याला आल्या. २० तारखेला संध्याकाळी पहिली यादी येण्याची अपेक्षा आहे आणि उर्वरित जागा आज वाटप झाल्यानंतर कदाचित २० तारखेला अंतिम यादी देखील येऊ शकेल. आज जागेवर सर्व तोडगा निघाला उर्वरित ६६ जागेवर आणि तो होईल आज बैठक त्यासाठीच आहे आणि कुठेही अडचण येणार नाही. जिंकण्याचा निर्धार केलेला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, आमची भूमिका सर्वसमावेशक आहे. जागावाटपसाठी दिल्लीत जायची गरज नाही, आम्ही महाराष्ट्रातच जागावाटप फायनल करू. जागावाटपावर आम्ही आजच किंवा उद्या पत्रकार परिषद घेऊ. आमच्यासोबत असेलेल्या इतर पक्षांनाही काही जागा आम्ही देणार आहोत. (पान ४ वर)

## मंगलदास बांदल यांच्या घरावर ईडीचा छापा

### भोसले बँक घोटाळा प्रकरणी ८५ कोटींची मालमत्ता जप्त

पुणे दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पुणेस्थित शिवाजीराव भोसले सहकारी बँक फसवणूक प्रकरणी पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल, हनुमंत संभाजी खेमधारे, सतीश जाधव आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या ८५ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) टाच आणली आहे.

पीएमएलए कायद्यानुसार या सर्वांच्या पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर येथील स्थावर मालमत्तांवर ईडीने टाच आणली आहे. बांदल यांच्या पुण्यातील महंमदवाडी, शिक्रापूर आणि बुरुंजवाडी (ता.शिरूर) येथील निवासस्थानांवर ईडीच्या पथकाने ऑगस्ट महिन्यात छापे टाकले होते. मंगलदास बांदल यांच्याकडे ५ आलिशान गाड्या आणि १ कोटी किमतीची चार मनगटी घड्याळेही आढळून आली होती.

पुणे जिल्ह्याच्या राजकारणात बांदल यांच्या नावाच्या वारंवार चर्चा केल्या जातात. शिरूर तालुक्यातील शिक्रापूर येथील बांदल पैलवान म्हणूनही त्यांची ओळख आहे. मंगलदास बांदल हे पुणे जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम विभागाचे माजी सभापती आहेत, वारंवार पक्षबदलाचे आरोप त्यांच्यावर होत असतो. शिरुरमध्ये कार्यकर्ते आणि सामाजिक, राजकीय क्षेत्रात त्यांना आप्पा म्हणून देखील ओळखले जाते.

मंगलदास बांदल हे कधीकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष होते. पुण्यातील एका सराफाला खंडणी मागितला प्रकरणात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांकडून त्यांची चौकशी सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना पक्षातून निलंबित केलं होतं. याशिवाय मंगलदास बांदल यांनी २००९ ला भाजपकडून विधानसभा निवडणूक लढवली होती. अपक्ष उमेदवार म्हणून ते जिल्हा परिषदेवरही निवडून गेले होते. तर २०१९ मध्येही त्यांनी दिलीप वळसे पाटील यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती.

शिरूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल यांनी बनावट खरेदी खताच्या आधारे शिवाजीराव भोसले सहकारी बँकेकडून (पान ४ वर)

## लोकांमध्ये आक्रोष, प्रचंड चीड, ही लाट देवेंद्र फडणवीसांचा कार्यक्रमच लावणार, जरांगेंचा पुन्हा इशारा

जालना दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मराठा आरक्षणा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी भाजपा आणि भाजपाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा एकदा इशारा दिला आहे. इथे सुखी कुणीच नाही. ही आक्रोषाची लाट यांना होरपळवून काढणार आहे. ही लाट देवेंद्र फडणवीसांचा कार्यक्रमच लावणार आहे, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा एकदा इशारा दिला. ते म्हणाले की, ही लाट आहे. याला गर्दी म्हणून नका. ही आक्रोषाची लाट आहे आणि ती १०० टक्के विजयाकडे जाणार आहे. धोका करणाऱ्याला आता ते सोडणार नाहीत. आक्रोषाची ही गर्दी प्रचंड चिडलेली आहे. इथे ना मराठा सुखात आहे. ना मुस्लिम, ना दलित ना गोरगरीब ओबीसी सुखात आहे, ना गरीब धनगर सुखात आहे. इथे सुखी कुणीच नाही. ही आक्रोषाची लाट यांना होरपळवून काढणार आहे. ही लाट देवेंद्र फडणवीसांचा कार्यक्रमच लावणार आहे.

जरांगे पाटील पुढे म्हणाले की, लोकांना चीड सहन होत नाही आहे. (पान ४ वर)

# पशुधन हिताय...

विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी सुरू झालेल्या मंत्रिमंडळाच्या निर्णयांच्या धडाक्यात राज्याच्या पशुसंवर्धन धोरणावर सरकारच्या मान्यतेची मोहोर उमटली आहे. राज्यातील लाखो पशुपालक, कोट्यवधी संख्येतील पशुधन आणि शेकडो कोटी रुपयांचे उत्पादन असलेल्या या क्षेत्राचा भविष्याच्या दृष्टीने वेगाने विकास करण्यासाठी या विभागाची फेररचना करण्याचे मुख्य उद्दिष्ट या धोरणामध्ये समोर ठेवण्यात आले आहे. मानवी आहारात शेतीजन्य उत्पादनांबरोबरच प्राणिज उत्पादनांचे महत्त्वाचे स्थान आहे. प्रामुख्याने दूध, दुग्धजन्य पदार्थ, अंडी-कोंबड्या हे घटक पोषणासाठी आवश्यक मानले जातात. वाढत्या लोकसंख्येस या पदार्थांचा पुरेसा पुरवठा होण्याच्या दृष्टीने पशुधनाची जोपासना आवश्यक आहे. तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्येही पशुधन क्षेत्राचे मोठे स्थान आहे. पूर्वी अनेक शेतकरी जोडधंदा म्हणून दूध किंवा कुक्कुटपालनाचा व्यवसाय करीत. बदलत्या काळात पशुपालन हा अनेकांचा मुख्य व्यवसाय झाला असून त्यामध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. काही काळापूर्वी असंघटित असणाऱ्या या क्षेत्रात आता व्यावसायिकता आली आहे. त्यामध्ये दूध, लोणी-बटर, मिठाई, दूध भुकटी, शीतपेये-आइसक्रीमसारखी उत्पादने, अंडी-चिकन यांची पुरवठा साखळी उभी राहिली असून अनेक मोठे उद्योगही या क्षेत्रात उतरले आहेत. या निमित्ताने पशुखाद्यासारखे अन्य पूरक व्यवसायही सुरू झाले असून या संपूर्ण क्षेत्रात लाखो रोजगारही निर्माण झाले आहेत. या व्यवसायाचा प्रमुख आधार असलेल्या पशुधनात वाढ व्हावी, त्यांच्या उत्पादकतेत वाढ व्हावी, यासाठी निरोगी पशुधन हा आवश्यक घटक आहे. सन २०१९ मध्ये झालेल्या पशुगणनेनुसार राज्यात ३.३१ कोटी जनावरे असून त्यामध्ये देशात महाराष्ट्राचा सातवा क्रमांक आहे. तसेच साडेसात कोटी कुक्कुट पक्षी असून त्यामध्ये राज्याचा पाचवा क्रमांक आहे. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात १४ हजार ३०० टन इतके दुधाचे उत्पादन झाले होते; मात्र देशाच्या सरासरीच्या तुलनेत प्रतिमाणशी दुधाचा पुरवठा कमी आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी हा पुरवठा वाढविणे, त्यासाठी जनावरांची दूध उत्पादनक्षमताही वाढविण्याची गरज आहे. राज्यात देशी गायींची दैनंदिन उत्पादनक्षमता दीड किलो, संकरित जनावरांची क्षमता सव्वासहा किलो, तर म्हशींची उत्पादनक्षमता साडेतीन किलो आहे. त्यामध्ये वाढ करण्यासाठी पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात. तसेच अंडी, मांस व लोकरीच्या उत्पादनवाढीसाठीही विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. पशुधन विकासासाठी विभागाच्या वतीने प्रामुख्याने पशुधनात वाढ, उत्पादकतेत वाढ, पशुधन चिकित्सा, लसटोचणी-उपचार, कृत्रिम रेतन आणि चारा-वैरण विकासाच्या योजना राबविण्यात येतात. तुकाराम मुंढे हे पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे सचिव असताना हे धोरण तयार करण्यात आले. त्यामध्ये दारिद्र्य निर्मूलन, पशुपालकांची समृद्धी, रोजगार निर्मिती आणि पोषण सुरक्षा हे प्रमुख उद्देश समोर ठेवण्यात आले आहेत. त्यानुसार पशुसंवर्धन आणि दुग्धविकास यांचा एकच विभाग करण्यात येणार आहे. फक्त पशुपालनाऐवजी पशूंची उत्पादकता ही संकल्पना समोर ठेवून कार्यक्रमांची आखणी होणार आहे. प्रशासकीय पातळीवर विभागात सव्वासात हजार पदांची भरती करून एकूण साडेपंधरा हजार पदे निश्चित करण्यात येणार आहेत. राज्यातील ३५१ तालुका पशुसंवर्धन कार्यालये, तसेच २१७ तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालये सुरू करण्यात येणार आहेत. उत्पादन ते विक्री एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार असून उत्पादनांच्या विक्रीसाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्यात येईल, असे या धोरणात म्हटले आहे. जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तालुक्यातच आधुनिक यंत्रणा असेल. जुनी कालबाह्य पदे रद्द करण्यात येणार असून या क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये असलेल्या पदांची निर्मिती होईल. राज्यातील दुसऱ्या श्रेणीतील सर्व दवाखान्यांचा समावेश आता पहिल्या श्रेणीत होईल. त्यामुळे येथे गुणवत्ताधारक पशुवैद्यकीय सेवा मिळतील. दरम्यान, कार्यालयांच्या फेररचनेला काही संघटनांनी विरोध केला होता. मात्र, आता सरकारच्या निर्णयामुळे या धोरणास गती मिळण्याची शक्यता आहे.

# साधी राहणी, सोज्वळ स्वभाव असा दानवीर : रतन टाटा



रतन टाटा हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. १९९० ते २०१२ या काळात ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते आणि ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष होते, तसेच त्यांच्या चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व करीत होते. ते पद्मविभूषण आणि पद्मभूषण या भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कारांचे प्राप्तकर्ते आहेत. रतन टाटा यांना २००० मध्ये पद्मभूषण आणि २००८ मध्ये पद्मविभूषण, भारत सरकारचा तिसरा आणि दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. टाटा यांना २००६ मध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक प्रशासनातील त्यांच्या कामासाठी 'महाराष्ट्र भूषण' आणि आसाममध्ये कर्करोगाच्या उपचारात योगदान दिल्याबद्दल २०२१ मध्ये 'आसाम वैभव' असे विविध राज्य नागरी सन्मानही मिळाले आहेत.

त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी ब्रिटिश राजवटीत मुंबई येथे झाला होता. 'रतन' हे नवल टाटा यांचे पुत्र आणि टाटा कुटुंबातील वंशज हाते, ज्यांना नंतर टाटा समूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पुत्र रतनजी टाटा यांनी दत्तक घेतले होते. टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या भाची सूनी टाटा या त्यांच्या आई होत. टाटांचे आजोबा होर्मुसजी टाटा हे रक्ताने टाटा कुटुंबाचे सदस्य होते. १९४८ मध्ये टाटा १० वर्षांचे असतांना, त्यांचे आई-वडील विभक्त झाले तेव्हा आणि त्यानंतर त्यांचे संगोपन केले आणि रतनजी टाटा यांच्या आजी आणि विधवा नवजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांना एक धाकटा भाऊ (जिम्मी टाटा) आहे आणि नोएल टाटा हे सावत्र भाऊ आहेत, जे त्यांच्या वडिलांच्या दुसऱ्या पत्नी सिमोन टाटा यांचे पुत्र आहेत. टाटा यांनी कधीही लग्न केले नाही आणि त्यांना मूलबाळ नव्हते. २०११ मध्ये त्यांनी सांगितले की, ''मी चार वेळा लग्न करण्याच्या जवळ आलो आणि प्रत्येक वेळी मी भीतीने किंवा एका कारणास्तव मागे हटलो''.

मुंबईच्या कॅम्पियन स्कूलमध्ये त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, शिमला येथील बिशप कॉटन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. नंतर त्यांनी १९५५ मध्ये न्यूयॉर्क येथील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतल्यानंतर टाटा यांनी कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला, ज्यामधून त्यांनी १९५९ साली वास्तुशास्त्र मध्ये पदवी प्राप्त केली. कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलचे व्यवस्थापन कार्यक्रमाचे ते माजी विद्यार्थी होते. १९७५ मध्ये त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या सात-आठवड्याच्या प्रगत व्यवस्थापन कार्यक्रमात भाग घेतला. कॉर्नेलमध्ये असतांना टाटा अल्फा सिग्मा फी फ्रेटरनिटीचे सदस्य बनले. त्यानंतर ते त्यांच्या कंपनीत रुजू झाले. तेव्हा ते टाटा स्टीलच्या शॉप फ्लोअरवर काम करायचे.

टाटा समूहाचे संस्थापक असलेल्या जमशेदजी टाटांचा नातू अशा पद्धतीने धडपड करतो आहे हे पाहून जे.आर.डी. प्रभावित झाले. आजीची तब्येत बिघडल्यामुळे तिला भेटायला भारतात आलेल्या रतन यांना जे.आर.डी. यांनी टाटा उद्योग समूहामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. १९६२ च्या डिसेंबर महिन्यात रतन टाटा समूहात दाखल झाले, मात्र समूहाच्या परंपरेनुसार ६२ ते ७१ त्यांना विविध कंपन्यांमध्ये काम करण्यास सांगण्यात आले. जमशेदपूरच्या टाटा स्टीलमध्ये अगदी कोळसा उचलण्यापासून ते भट्टीपाशी काम करण्यापर्यंतचे सर्व अनुभव घेतल्यानंतरच १९७१ मध्ये त्यांच्याकडे टाटा समूहातील नेल्को या कंपनीची धुरा सोपविण्यात आली. नेल्को ही त्यावेळी तोट्यात चालणारी कंपनी होती. रेडिओ आणि टेलिव्हिजनचे उत्पादन करणारी ही कंपनी पुढील तीन वर्षांमध्ये स्वतःच्या पायावर उभी करण्यात रतन टाटा यांनी यश मिळविले. संपूर्ण बाजारपेठेतील नेल्कोचा हिस्सा दोन टक्क्यांवरून वीस टक्के झाला, पण देशात आणीबाणी जाहीर झाली. पाठोपाठ आलेल्या मंदीमध्ये नेल्कोला आपल्या कामगारांच्या मागण्या मान्य करण्यात अपयश आले आणि ही कंपनी बंद पडली. रतन टाटा यांना अनुभवाला आलेले ते पहिले अपयश होते.

१९७७ मध्ये रतन टाटांवर एम्प्रेस मिल या टाटा समूहातील बंद पडावयास आलेल्या मिलची जबाबदारी सोपविण्यात आली. एम्प्रेस मिलच्या यंत्रसामग्रीमध्ये अनेक वर्षांमध्ये गुंतवणूक करण्यात आली नव्हती. कामगारांची संख्याही मोठी आणि त्याच्या तुलनेत उत्पादन तूटपुंजे असे चित्र असलेल्या या मिलमध्ये पन्नास लाख रुपयांची गुंतवणूक करण्याची विनंती रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहाला केली, पण नानी पालखीवाला, अजित केरकर आणि रुसी मोदी या संचालकांनी त्याला विरोध केल्याने अखेर ही मिलही बंद करण्यात आली. रतन टाटांच्या नावावर दुसरे अपयश जमा झाले. या सर्व प्रकारामुळे रतन टाटा चांगलेच दुखावले गेले होते, पण त्याचबरोबर अनुभवाच्या शाळेमध्ये बरेच काही शिकले होते. १९८१ मध्ये जे.आर.डी. टाटा यांनी त्यांच्याकडे टाटा इंडस्टीजची सूत्रे सोपविली. त्याच वेळेस ते त्यांचे वारसदार आणि टाटा उद्योगसमूहाचे भावी प्रमुख असणार हे स्पष्ट झाले होते. १९९१ मध्ये जे.आर.डी. यांनी स्वतःच उद्योगसमूहाची सर्व सूत्रे रतन टाटांकडे सोपवून निवृत्ती पत्करली.

त्यानंतर सुरू झालेली यशाची मालिका आणि नवे विक्रम अजूनही सुरूच आहेत. कोरस, जग्वार, टेटली आणि लँड रोव्हर सारख्या जगातल्या नामांकित कंपन्या टाटांनी खरेदी केल्या. त्यात २००० मध्ये त्यांनी टाटा टी मिळवून टेटली विकत घेतली आणि जगातील सर्वात मोठी टी बेग्ज बनवणारी कंपनी निर्माण केली. २००४ मध्ये साऊथ कोरिया मधील डेवू कमर्शियल व्हेईकलला रतन टाटा यांनी विकत घेतले. टाटा मोटर्स घेऊन जग्वार लँड रोव्हर विकत घेतली आणि टाटा स्टील घेऊन कोरस कंपनीचे अधिग्रहण केले. २००७ मध्ये टाटा ने लंडनमधील कोरस ग्रुप ही स्टील कंपनी विकत घेतली, नंतर तिचे नाव टाटा स्टिल युरोप ठेवण्यात आले. २००८ मध्ये टाटाने कॉर्नेलला ५० दशलक्ष डॉलर भेट दिले, जे विद्यापीठाच्या इतिहासातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय देणगीदार बनले. याच काळात टाटा समूहाचे तत्कालीन प्रमुख जे.आर.डी. टाटा यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यांनी मोठ्या प्रमाणावर भारत-केंद्री गटातील टाटा समूहाला जागतिक व्यवसायात रूपांतरित करण्याच्या प्रयत्न केला.

या भरारीनं देशातल्या तरुणांना नवी ऊर्जा दिली. 'मोठी स्वप्न पाहाणं आणि ती प्रत्यक्षात आणणं' हा रतन टाटांचा स्वभाव होता. याच स्वप्नांमधून इंडिगो आणि नॅनोची निर्मिती झाली आणि कुठलीच गोष्ट अशक्य नाही, हे सुध्दा टाटांनी कतृत्वाने सिद्ध करुन दाखविले. हे यश मिळवत असतांना टाटांनी कधीच आपल्या मुल्यांशी तडजोड केली नाही. यामुळंच सचोटी, गुणवत्ता म्हणजे टाटा हे समीकरण तयार झालंय. निवृत्तीनंतर ते नवउद्योजकांना प्रोत्साहन देत असतांना त्यांना श्वासोच्छवासामुळे गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि ७ ऑक्टोबर २०२४ पासून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. वय-संबंधित समस्यांमुळे ९ ऑक्टोबर २०२४ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकार आणि झारखंड सरकारने एक दिवसाचा शोक जाहीर केला. १० ऑक्टोबर रोजी टाटा यांचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंतिम संस्कारादरम्यान त्यांना लष्करी आणि २१ तोफांची सलामी देण्यात आली. मुंबई पोलिसांनी समारंभपूर्वक 'गार्ड ऑफ ऑनर' दिला आणि त्यांचे पार्थिव भारतीय ध्वजात गुंडाळले गेले.

पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनाने संपूर्ण देश हळहळला. तांत्रिक, औद्योगिक सर्वच क्षेत्रात टाटा समूहाचे नाव अग्रणी आहे. त्यांनी अनेकांना कौशल्य प्रदान करून रोजगार दिलेला आहे तसेच, त्यांचे विविध क्षेत्रांच्या व उद्योगांच्या विकासासाठी दिलेले योगदान हे अतुलनीय आहे, त्यामुळे भारतातील पहिला कौशल्य विद्यापीठास त्यांचे नाव मिळावे ही अतिशय सन्मानाची गोष्ट आहे. त्याचबरोबर नवीन उद्योगांना सुद्धा त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेऊन सहकार्य केले. ज्येष्ठ उद्याोगपती रतन टाटा यांच्या स्मृतींचे जतन करण्यासाठी आणि उद्योग क्षेत्रातील या महान विभूतीच्या कार्याला आदरांजली देण्याच्या उद्देशाने नुकतेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. 'पद्माविभूषण रतन टाटा कौशल्य विद्यापीठ' असे या विद्यापीठाचे नाव असेल. या नामकरणामुळे विद्यापीठाच्या माध्यमातून होणाऱ्या तांत्रिक प्रगतीस चालना मिळेल आणि युवकांना रतन टाटा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठात शिक्षण घेण्याचा अभिमान वाटेल. या विद्यापीठाच्या माध्यमातून उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवणे तसेच नवोदितांच्या संकल्पनांना बळ देण्याचे उद्दिष्ट आहे. हा उद्देश रतन टाटा यांच्या विचारांचा आरसा असून त्याचे आचरण म्हणजेच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली आहे. देशातील एक आदर्श व्यक्तिमत्व, सुप्रसिद्ध उद्योगपती व टाटा समूहाचे अध्यक्ष रतनजी टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**– प्रविण बागडे**
**नागपूर**

***

# अन्न परब्रम्ह, सर्वांचे आद्य: कर्तव्य

जागतिक अन्न दिन हा १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या स्थापनेच्या तारखेच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस भूक आणि अन्न सुरक्षेशी संबंधित इतर अनेक संस्थांद्वारे मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, ज्यामध्ये जागतिक अन्न कार्यक्रम, जागतिक आरोग्य संघटना आणि कृषी विकासासाठी आंतरराष्ट्रीय निधी. वर्ल्ड फूड प्राइज फाउंडेशनला २०२० चे शांततेचे नोबेल पारितोषिक भूकेशी लढा देण्यासाठी, संघर्षाच्या भागात शांततेसाठी योगदान देण्यासाठी आणि युद्ध आणि संघर्षासाठी शस्त्राच्या रूपात भुकेचा वापर थांबवण्यात प्रमुख भूमिका बजावल्याबद्दल मिळाले. २०१४ साठी जागतिक अन्न दिनाची थीम कौटुंबिक शेती ही होती. ''जगाला अन्न देणे, पृथ्वीची काळजी घेणे''; २०१५ मध्ये ते ''सामाजिक संरक्षण आणि कृषी : ग्रामीण गरिबीचे चक्र तोडणे'' होते; २०१६ मध्ये ते ''हवामान बदलत आहे. अन्न आणि शेती देखील आवश्यक आहे'', जी २००८ आणि त्यापूर्वी २००२ आणि १९८९ ची थीम प्रतिध्वनी करते. २०२० ची थीम ''वाढा, पोषण करा, टिकून राहा, एकत्र. आमच्या कृती हे आमचे भविष्य आहे.''

जागतिक अन्न दिनाची स्थापना अन्न आणि कृषी संघटनेच्या सदस्य देशांनी नोव्हेंबर १९७९ मध्ये संघटनेच्या २० व्या सर्वसाधारण परिषदेत केली. हंगेरीचे माजी कृषी आणि अन्न मंत्री डॉ. पाल रोमानी यांच्या नेतृत्वाखाली हंगेरियन शिष्टमंडळाने अन्न आणि कृषी संघटन परिषदेच्या २० व्या सत्रात सक्रिय भूमिका बजावली आणि जागतिक अन्न दिन जगभरात साजरा करण्याची कल्पना सुचवली. तेव्हापासून दरवर्षी १५० हून अधिक देशांमध्ये साजरा केला जातो, गरिबी आणि उपासमारीच्या समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करते. १९८१ पासून, कृतीसाठी आवश्यक असलेल्या क्षेत्रांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि एक सामान्य फोकस प्रदान करण्यासाठी जागतिक अन्न दिनाने दरवर्षी एक वेगळी थीम स्वीकारली आहे. अन्न आणि कृषी संघटना दरवर्षी वर्धापन दिनाचे स्मरण आणि प्रचार करण्यासाठी जागतिक अन्न दिन पदके जारी करते. बहुतेक थीम शेतीभोवती फिरतात कारण केवळ शेतीमधील गुंतवणूक - शिक्षण आणि आरोग्यासाठी समर्थनासह - ही परिस्थिती बदलेल. त्या गुंतवणुकीचा मोठा हिस्सा खाजगी क्षेत्राकडून आला पाहिजे, ज्यामध्ये सार्वजनिक गुंतवणूक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, विशेषत: खाजगी गुंतवणुकीवर त्याचा सुलभ आणि उत्तेजक प्रभाव लक्षात घेता. अनेक विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेतील प्रेरक शक्ती म्हणून शेतीचे महत्त्व असूनही, या महत्त्वपूर्ण क्षेत्राला वारंवार गुंतवणुकीची कमतरता भासते. विशेषतः, गेल्या २० वर्षांत कृषी क्षेत्रासाठी परकीय मदतीत लक्षणीय घट झाली आहे.



अन्न हा कोणताही पदार्थ आहे, जो जीवांना पौष्टिक समर्थन प्रदान करण्यासाठी वापरला जातो. कर्बोदके, मेद, प्रथिने आणि पाणी यांनी बनलेला व पोषणासाठी प्राणी खाऊ शकतात असा कुठलाही पदार्थ. वनस्पती, प्राणी, कवक व किण्वन यापासून अन्न मिळते. अन्न सहसा वनस्पती किंवा प्राणी उत्पत्तीचे असते. अन्नामध्ये आवश्यक पोषक घटक असतात जसे की कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, प्रथिने किंवा खनिजे. हे पदार्थ एखाद्या जीवामध्ये अंतर्ग्रहण केले जातात आणि जीवांच्या पेशीद्वारे ऊर्जा मिळवण्यासाठी, आयुष्य टिकवण्यासाठी, वाढ होण्यासाठी आत्मसात केले जातात.

ऐतिहासिक दृष्ट्या, मानवांनी दोन पद्धतींनी अन्न सुरक्षित केले. पहिला शिकार गोळा करणे आणि दुसरा शेती ज्याने आधुनिक मानवांना प्रामुख्याने सर्वभक्षी आहार दिला. जगभरात मानवतेने असंख्य पाककृती आणि पाक कला तयार केल्या आहेत. ज्यात घटक, औषधी वनस्पती, मसाले, तंत्र आणि पदार्थांचा समावेश आहे. आज जगातील सतत वाढणाऱ्या लोकसंख्येस आवश्यक असणारी बहुतेक अन्न उर्जा अन्न उद्योगाद्वारे पुरविली जाते. आंतरराष्ट्रीय खाद्य संघटना, जागतिक संसाधन संस्था, जागतिक अन्न कार्यक्रम, अन्न व कृषी संघटना आणि आंतरराष्ट्रीय अन्न माहिती परिषद अशा संस्थांद्वारे अन्न सुरक्षा नियंत्रित केली जाते. ते टिकाव, जैविक विविधता, हवामान बदल, पौष्टिक अर्थशास्त्र, लोकसंख्या वाढ, पाणीपुरवठा आणि अन्न प्रवेश यासारख्या मुद्द्यांकडे लक्ष देतात. अन्नाचा हक्क हा आंतरराष्ट्रीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क (आयसीईएससीआर) आंतरराष्ट्रीय कराराद्वारे प्राप्त केलेला मानवाधिकार आहे. ज्याची ओळख ''पुरेशा अन्नासह समाधानकारक जीवनशैलीचा हक्क'' आणि ''भुकेपासून मुक्त होण्याचा मूलभूत अधिकार'' अशी आहे. अन्नाचा बहुतेक भाग सुंयगांच्या तीन प्रधान घटकांचा बनलेला असतो, कार्बोहायड्रेटे, वसा आणि प्रथिने. याशिवाय लवणे व खनिज द्रव्ये, जीवनसत्वे आणि इतर कार्बनी संयुगे व पाणी या सर्वांची प्राण्यांना अन्नात जरूरी असते. बहुतेक अन्नाची उत्पत्ती वनस्पतींमध्ये होते. काही अन्न थेट वनस्पतींमधून प्राप्त केले जाते. परंतु जे अन्न स्रोत म्हणून वापरले जातात ते प्राणी देखील वनस्पतींमधून मिळणारे अन्न देऊन वाढविले जाते. तृणधान्य हे मुख्य अन्न आहे जे जगातील कोणत्याही प्रकारच्या पिकापेक्षा अधिक अन्न ऊर्जा देते. कॉर्न (मका), गहू आणि तांदूळ या सर्व प्रकारांचा जगभरातील धान्य उत्पादनात ८७% वाटा आहे. जगभरात पिकविलेले बहुतेक धान्य पशुधनांना दिले जाते. प्राणी किंवा वनस्पती स्रोत नसलेल्या काही पदार्थांमध्ये विविध खाद्य बुरशी, विशेषतः मशरूम समाविष्ट असतात. बुरशी आणि सभोवतालच्या जीवाणूंचा वापर आंबवलेले आणि लोणचेयुक्त पदार्थ जसे की खमीर घातलेली भाकर, मद्यपेय, चीज, लोणचे, कोंबुका (किण्वित चहा) आणि दही बनवण्यासाठी केला जातो. काही वर्षांपूर्वी एका मोठ्या कंपनीत कामाला वेग आणि आपल्या कुटुंबियांना आहे.

बऱ्याच वनस्पती आणि वनस्पतींचे भाग अन्न म्हणून खाल्ले जातात आणि सुमारे २००० वनस्पती प्रजाती अन्नासाठी लागवड केल्या जातात. या वनस्पती प्रजातींमध्ये अनेक भिन्न प्रकार आहेत. वनस्पतींची बियाणे हा मनुष्यांसह जनावरांच्या आहाराचा चांगला स्रोत आहे, कारण त्यात ओमेगा सारख्या अनेक आरोग्यदायी स्निग्ध पदार्थासह वनस्पतीच्या सुरुवातीच्या वाढीसाठी आवश्यक पोषक घटक असतात. खरं तर मानवाकडून खाल्लेले बहुतेक अन्न हे बीज-आधारित पदार्थ असतात. खाद्यतेल बियाणांमध्ये तृणधान्य (मका, गहू, तांदूळ, इत्यादी) शेंगा (सोयाबीन, वाटाणे, मसूर, इत्यादी) आणि शेंगदाणे यांचा समावेश आहे. तेलबिया बहुतेकदा चांगले तेल तयार करण्यासाठी दाबल्या जातात. सूर्यफूल, अंबाडी बियाणे, रॅपसीड (कॅनोला तेलासह), तीळ, इत्यादी. बियाण्यांमध्ये विशेषतः असंतृप्त स्निग्ध पदार्थ जास्त असतात आणि मध्यमतेमध्ये सकस अन्न मानले जाते. आजच्या दिवशी अन्नदात्या बळीराजाला धन्यवाद म्हणु या आणि दररोज अन्न शिल्लक राहून वाया जाणार नाही याची काळजी घेऊ या.

अन्न वाचवा, जग वाचवा !
जागतिक अन्न दिनाच्या शुभेच्छा!!

**– प्रवीण बागडे**
नागपूर

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनंवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

# पारदर्शक व मुक्त वातावरणात निवडणूक घेण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज- जिल्हाधिकारी प्रजित नायर

## आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी सोशल मिडिया व फेक न्यूजवर करडी नजर आचारसंहितेचे पालन करा

गोंदिया दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीची घोषणा केली त्या क्षणापासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीचा उत्सव असलेली ही निवडणूक पारदर्शक व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. बळाचा प्रयोग (मसल पावर), पैशांचा वापर (मनी पावर), चुकीची माहिती (मिस इन्फॉर्मेशन) आणि आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन ही निवडणूक यंत्रणेसमोरील महत्वाची आव्हाने असून यावर मात करण्यासाठी आयोगाच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना करण्यात येतील असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी श्री. नायर बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक किरण अंबेकर, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेवून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची घोषणा केली असून आजपासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. यासंबंधिची अधिसूचना जारी करण्यात आली असून आदर्श आचारसंहितेची माहिती सुध्दा निवडणूक आयोगाने दिली आहे. सदर अधिसूचनेद्वारे २२ ऑक्टोबर रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करणे, २९ ऑक्टोबर- नामनिर्देशन पत्रे सादर करण्याची अंतिम मुदत, ३० ऑक्टोबरला नामनिर्देशन पत्राची छाननी, ४ नोव्हेंबर- उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत, २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

सोशल मिडिया, पेड न्यूज व फेक न्यूजवर आयोगाची व जिल्हा प्रशासनाची करडी नजर असणार असून फेक न्यूज पसरविणाऱ्यावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेल कडक कारवाई करेल. नागरिकांनी सोशल मिडियावर व्यक्त होतांना काळजी घ्यावी तसेच चुकीचे मेसेज पोस्ट करु नये किंवा फॉरवर्ड करु नये असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्ह्यात कुठेही अनुचित घटना घडू नये यासाठी जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य अपेक्षीत आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

गोंदिया जिल्ह्यात ६३-अर्जुनी मोरगाव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया व ६६-आमगाव असे एकूण ४ विधानसभा मतदार संघ आहेत. दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत जिल्ह्यात एकूण ११ लाख २१ हजार ४६० मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५२ हजार १८१ असून स्त्री मतदार ५ लाख ६९ हजार २६९ आहेत व इतर १० मतदार आहेत. जिल्ह्यात उपलब्ध असलेले मशिन्सची संख्या- -१५६७, -२८५२, -१६९५ आहेत. एकूण मतदान केंद्रांची संख्या १२८४ आहे. या निवडणुकीत जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाद्वारे विविध उपक्रम राबवून मतदान जनजागृतीद्वारे प्रयत्न करण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागरिकांना निवडणूक विषयी माहिती घेण्याकरीता व निवडणूक विषयी तक्रार बाबत गोंदिया जिल्ह्यामार्फत हेल्पलाईन क्रमांक १९५० (टोल फ्री), दूरध्वनी क्रमांक ०७१८२-२३६१४८, मोबाईल क्रमांक ८०८०४५३१५२ कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या आदर्श आचारसंहिता दरम्यान निवडणुकीशी संबंधीत विविध कामे सुरळीत व विहित कालावधीत पार पाडण्याच्या कामाकरीता भारत निवडणूक आयोगाचे सूचनेप्रमाणे जिल्हास्तरावर १६ नोडल




अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे असे ते म्हणाले. आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत अवैध रक्कम, दारु, प्रतिबंधीत औषधे, नशिले पदार्थांच्या वाहतुकी संदर्भात होणाऱ्या जप्तीबाबत प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली असून अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडणुक कालावधीत प्रसारमाध्यमांनी फेक न्यूज पोस्ट करुन विनाकारण अफवा पसरवू नये. पेड न्यूज बाबत आयोगाच्याच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे, अन्यथा प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येणार. मतदान हा एक उत्सव आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील मतदारांनी आपला मतदानाचा हक्क अवश्य बजावावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी-जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर

## नोडल अधिकारी व विभागप्रमुखांच्या बैठकीत निर्देश

धुळे दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ साठीची घोषणा केली असून आजपासून आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. धुळे जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघासाठी २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान, तर २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक नोडल अधिकारी तसेच विभाग प्रमुखांनी सतर्क राहून आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करीत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात आज विधानसभा निवडणुकीसाठी नेमलेले सर्व नोडल अधिकारी व विभागप्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिका आयुक्त अमिता दगडे पाटील, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील उपस्थित होते.

जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पापळकर म्हणाले, आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. आदर्श आचारसंहितेचे गांभीर्य प्रत्येकाने समजून घ्यावे. ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका क्षेत्रातील सर्व विभागांनी २४ तासात शासकीय इमारतीवरील आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व राजकीय पक्षांचे बॅनर, होर्डिंग्ज, फलक, पोस्टर तत्काळ काढून त्यांचा अहवाल उद्या ४ वाजेपर्यंत सादर करावा. कोणत्याही नवीन कामांची प्रशासकीय मान्यता तसेच कार्यारंभ आदेश, देण्यात येवू नये. प्रशासकीय मान्यतेचे कामनिहाय विवरणपत्र बघून त्यांचा अहवाल सादर करावा. तसेच कोणत्याही शासकीय अधिकारी कर्मचा-यांनी राजकीय व्यक्तींसोबत बैठका घेवू नये.

तसेच कोणत्याही रॅलीत सहभागी होवू नये. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांची शासकीय वाहने तातडीने जमा करावीत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने सर्व एसटी बसेसवर लावण्यात आलेला जाहिरात मजकूर तातडीने काढण्यात यावा. नोडल अधिकाऱ्यांनी आदर्श आचारसंहिता पुस्तिकेचा सखोल अभ्यास करावा. अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळावरील माहिती जाणून घ्यावी. आचारसंहितेचा भंग झाल्याचे निर्देशनास आल्यास संबंधितांवर तत्काळ गुन्हे दाखल करावेत, असेही निर्देश त्यांनी दिले. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास तक्रार करण्यासाठी नागरिकांनी सी-व्हिजल ॲपचा वापर करावा. नागरिकांना एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचे या ॲपमध्ये छायाचित्र अथवा व्हीडीओ काढून तक्रार नोंदविता येईल. या तक्रारींवर आचारसंहिता कक्षामार्फत त्वरीत कार्यवाही करावी. राजकीय पक्षांनी विविध परवानगीसाठी सुविधा ॲपचा वापर करावा असेही त्यांनी सांगितले.

अपर पोलीस अधीक्षक श्री. काळे म्हणाले की, आदर्श आचारसंहितेचे पालन करीत असताना कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्वरीत संबंधित यंत्रणेला कळवावे. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गावंडे यांनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत शासकीय वाहने, कर्मचारी किंवा यंत्रणेचा निवडणूक प्रचार विषयक कामासाठी वापर होणार नाही, याची सर्व विभागप्रमुख यांनी दक्षता घ्यावी. असे त्यांनी सांगितले. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व नोडल अधिकारी, विभाग प्रमुख उपस्थित होते.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ




कोल्हापूर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाराष्ट्र राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना वयोमान परत्वे येणारे दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी, आवश्यक सहाय्य उपकरणे तसेच मनस्वास्थ्य केंद्र, योगउपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. या मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गारगोटी, कोल्हापूरमधून शुभारंभ करण्यात आला.

या योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना एक वेळ एक रकमी ३०००/- रुपयांच्या मर्यादित अनुदान देय आहे. राज्यात आज अखेर १७ लाख २३ हजार ३० इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी कोल्हापूर जिल्ह्यातील पात्र ४० हजार २२० लाभार्थ्यांच्या खात्यावर डीबीटीद्वारे निधी वर्ग करण्यात येणार आहे. या योजनेचा गारगोटी या ठिकाणी शुभारंभ झाल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.

या अनुदानातून ज्येष्ठ नागरिकांनी आवश्यक असलेले सहाय्य उपकरणे खरेदी करावे तसेच मनस्वास्थ्य केंद्र युवोपचार केंद्र इत्यादीद्वारे शिबिरामध्ये सहभागी व्हावे असेही आवाहन मुख्यमंत्री महोदय यांनी केले. कोल्हापुरातून सुरू झालेल्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेची आता राज्यभरातील सर्व जिल्ह्यामधून अंमलबजावणी सुरू होत आहे. प्रातिनिधिक स्वरूपामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील नामदेव गोपाळ भोसले व कांचन अप्पासो रेडेकर यांना तीन हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते सुपुर्द करण्यात आला. यावेळी आमदार प्रकाश अबीटकर, जिल्हाधिकारी अमोल येडगे, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, उपविभागीय अधिकारी हरेश सूळ, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सचिन साळे उपस्थितीत होते.

# १०० टक्के मतदानासह पारदर्शक व भयमुक्त निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियोजन करा-अमोल येडगे

कोल्हापूर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- लोकसभा निवडणूक २०२४ मधील मतदान टक्केवारीत वाढ करत यावेळी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सर्व १०० टक्के मतदार मतदान केंद्रात जावून मतदान करतील. तसेच सर्व निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडेल यासाठी सर्व यंत्रणांनी सुक्ष्म नियोजन करा अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अमोल येडगे यांनी दिल्या. आचारसंहिता लागू झाल्यानंतर नोडल अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, मागील लोकसभा निवडणूकीचा अनुभव सोबत घेऊन कोणकोणत्या स्तरावरती अडचणी आल्या त्या सोडवून सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समन्वयाने आदर्श आचारसंहितेचे पालन, मतदार जनजागृती, कायदा व सुव्यवस्थेचे योग्य पालन होईल याची खात्री करा. मतदार याद्या अंतिम करण्यापासून ते प्रत्यक्ष मतदान होईपर्यंत मतदारांच्या अडचणी सोडविल्या जातील याविषयी प्राधान्याने लक्ष द्या. यावेळी पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, उपजिल्हाधिकारी निवडणूक समाधान शेंडगे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांच्यासह निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने नेमणूक करण्यात आलेले सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते. यावेळी मतदार जनजागृती, प्रशिक्षण नियोजन, आचारसंहिता व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, जिल्हा सुरक्षा आराखडा, मतदान कर्मचारी डाटाबेस तयार करणे, ईव्हीएमची सरमिसळ, निवडणूक प्रक्रिया कर्मचारी नियुक्ती व व्यवस्थापन, इव्हीएम मागणी व प्राथमिक तपासणी, ईव्हीएम विधानसभा मतदार संघाना वाटप करणे, स्ट्रॉगरुम व्यवस्थापन, मतमोजणी केंद्रे व्यवस्थापन, बॅलेट पेपर, पोस्टल, गृहमतदान, मतदार याद्या अनुषंगिक सर्व कामकाज या अनुषंगाने सूचना दिल्या. तसेच निवडणूक साहित्य मागणी, उपलब्धता, वाटप व व्यवस्थापन, वाहतुक व्यवस्था, निवडणूक खर्च परिक्षण व व्यवस्थापन, मीडिया व संपर्क व्यवस्थापन व सोशल मीडिया, निवडणूक निरीक्षक यांची व्यवस्था व दौरा, तक्रार निवारण व मतदार मदत केंद्र, संपर्क व्यवस्थापन, संगणकीकरण सायबर सिक्युरिटी आणि माहिती व तंत्रज्ञान, एक खिडकी योजना, सैनिक मतदारांच्या टपाली मतपत्रिकांचे अनुषंगाने संबंधित अभिलेख संपर्क साधणे, दिव्यांग मतदान प्रक्रिया, मतदान केंद्रावरील किमान सुविधा याबाबतही सविस्तर आढावा घेण्यात आला.

# विधानसभा निवडणूकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी होणार मतमोजणी

धुळे दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार धुळे जिल्ह्यातील साक्री, धुळे ग्रामीण, धुळे शहर, शिंदखेडा व शिरपूर या ५ विधानसभा मतदार संघासाठी बुधवार, २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान तर शनिवार, २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीची आजपासून धुळे जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाली आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संदर्भात माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिका आयुक्त अमिता दगडे पाटील, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके यांच्यासह प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी श्री. पापळकर म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. धुळे जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघासाठी निवडणुकीची अधिसूचना मंगळवार, २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रसिद्ध होईल. उमेदवारांना नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक मंगळवार, २९ ऑक्टोबर, २०२४ असा आहे. नामनिर्देशनपत्राची छाननी बुधवार, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस सोमवार, दिनांक ४ नोव्हेबर,२०२४ आहे. या निवडणूकीसाठी बुधवार, २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होईल तर शनिवार, २३ नोव्हेबर, २०२४ मतमोजणी होईल. तर सोमवार, २५ नोव्हेंबर, २०२४ रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे. धुळे जिल्ह्यात साक्री, धुळे ग्रामीण, धुळे शहर, शिंदखेडा व शिरपूर या ५ विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

धुळे जिल्ह्यात १५ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत ०५-साक्री विधानसभा मतदारसंघात १ लाख ८६ हजार ०६९ पुरुष, १ लाख ७७ हजार ३७९ महिला, ७ तृतीयपंथी असे ३ लाख ६३ हजार ४५५ मतदारांची संख्या आहे. ०६-धुळे ग्रामीण विधासभा मतदारसंघात २ लाख ९ हजार ५०१ पुरुष, १ लाख ९७ हजार १०२ महिला, १ तृतीयपंथी असे ४ लाख ६ हजार ६०४ मतदारांची संख्या आहे. ०७-धुळे शहर विधानसभा मतदारसंघात १ लाख ८६ हजार ७११ पुरुष, १ लाख ७३ हजार ४७५ महिला, ३१ तृतीयपंथी असे ३ लाख ६० हजार २१७ मतदारांची संख्या आहे. ०८- शिंदखेडा विधानसभा मतदारसंघात १ लाख ७२ हजार ५७४ पुरुष, १ लाख ६६ हजार ४८७ महिला, असे ३ लाख ३९ हजार ०६१ मतदारांची संख्या असून ०९-शिरपूर विधानसभा मतदारसंघात १ लाख ७५ हजार ३७१ पुरुष, १ लाख ७२ हजार १३० महिला, ११ तृतीयपंथी असे ३ लाख ४७ हजार ५१२ असे एकूण १८ लाख १६ हजार ८४९ मतदार आहेत.

धुळे जिल्ह्यात सेना दलातील २ हजार ४७७ मतदार आहेत. तर ८५ वर्षावरील वयोगटातील मतदारांची संख्या २० हजार ७९२ इतकी असून जिल्ह्यात ११ हजार ४९३ इतके मतदार हे दिव्यांग आहे. आवश्यकतेनुसार त्यांच्यासाठी पोस्टल बॅलेटची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. तसेच मतदान केंद्रावर त्यांच्या सोईसाठी आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. जिल्ह्यात १ हजार ७५२ मतदान केंद्र असून आयोगाच्या सूचनानुसार ५० टक्के मतदान केंद्रावर वेबकॉस्टिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यानुसार ८७६ मतदान केंद्राचे वेबकॉस्टिंग करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ५ मतदान केंद्र हे क्रिटीकल आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यात सेक्टर अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली असून बैठे व फिरते पथक कार्यान्वित करण्यात येत आहे.

जिल्ह्यात आजपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितचे अनुषंगाने शासकीय जागेवरील बॅनर, पोस्टर काढण्यात येवून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यावर्षी मतदानांची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीपद्वारे मोठया प्रमाणात जिल्हाभरात विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचारी यांना पोस्टल बॅलेटद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध आहे. व्होटर हेल्प लाईनद्वारे मतदारांना मतदानाचे दिवशी ऑनलाईन पध्दतीने आपले नाव कोणत्या मतदान केंद्रावर आहे त्याबाबत माहिती मिळविण्यासाठी व्होटर हेल्पलाईन ॲपचा वापर करावा. सी -व्हिजल ॲपद्वारे नागरीक आचारसंहिता भंगाची तक्रार करु शकतात.

तर केवायसी ॲपद्वारे नागरिकांना निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची सर्व माहिती जाणून घेता येणार आहे. तर राजकीय पक्ष व उमेदवारांना विविध परवानगीसाठी सुविधा ॲप द्वारे उमेदवार विविध परवानगी मागू शकतात. मागील निवडणुकीत ज्याठिकाणी कमी मतदान झाले होते, अशा ठिकाणी मेळावे, कार्यक्रम, पथनाट्य, शाळा व कॉलेजमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी नागरिकांनी भयमुक्त वातावरणात मतदान करावे, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्री. काळे यांनी विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी एमपीडी तसेच तडीपारचे आदेश पारीत करण्यात आले आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर आवश्यक पोलीस बंदोबस्ताचा आराखडा व केलेल्या नियोजनाची यावेळी माहिती दिली.

# आयएफएटी इंडिया २०२४ च्या पहिल्या दिवशी अभूतपूर्व उपस्थिती, भारताच्या पर्यावरणीय समस्यांवर वाढत्या लक्षाचे प्रतिबिंब

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- आयएफएटी इंडिया २०२४ च्या ११व्या आवृत्तीच्या पहिल्याच दिवशी अभूतपूर्व प्रतिसादासह कार्यक्रमाची शानदार सुरुवात झाली आहे. अभ्यागतांच्या रेकॉर्डब्रेक उपस्थितीने भारतातील पर्यावरणीय समस्यांवर विशेषत: पाणी, कचरा आणि पुनर्वापर व्यवस्थापनाच्या क्षेत्रात तातडीच्या उपायांची गरज अधोरेखित केली आहे. या कार्यक्रमात, तंत्रज्ञानाच्या नव्या वाटा आणि ज्ञान-संवादाच्या प्लॅटफॉर्मच्या विविध सादरीकरणांमुळे मोठे लक्ष वेधले आहे. या पहिल्या दिवशी अनेक उत्पादनांचे उद्घाटन करण्यात आले.

भारतासमोरील वाढत्या पर्यावरणीय संकटांना तोंड देण्यासाठी शाश्वत पाणी व्यवस्थापन, ठोस कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर यांसारख्या उपाययोजनांची तातडीची गरज आहे. या पार्श्वभूमीवर,आयएफएटी इंडिया २०२४ मध्ये भारतासह जगभरातून ४८५ प्रदर्शकांनी सहभाग घेतला आहे. हेआयएफएटी इंडिया २०२४ चे महत्त्व आणि आंतरराष्ट्रीय मंच म्हणून त्याच्या वाढत्या भूमिकेचे उदाहरण आहे.

यावर्षी, जर्मनी, कॅनडा, दक्षिण कोरिया, स्वित्झर्लंड, नॉर्वे, नेदरलँड्स यांसारख्या देशांच्या समर्पित मंडपांसह २०% आंतरराष्ट्रीय सहभागाने जागतिक उपस्थितीची नोंद घेतली आहे. यामुळे जगभरातील तंत्रज्ञ, नवोपक्रमक, धोरणकर्ते आणि सरकारी अधिकारी पर्यावरणीय तंत्रज्ञानाच्या दृष्टीने एकत्र आले आहेत. या प्लॅटफॉर्मवर पाणी, कचरा आणि प्रदूषण नियंत्रण यांसारख्या क्षेत्रात तांत्रिक उपाययोजना मांडल्या जात आहेत.

उद्घाटन सोहळ्यात अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे () आयुक्त भूषण गगरानी, मीरा भयंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर, मेसे म्युनिक इंडिया चे सीईओ भूपिंदर सिंह, जर्मनीचे महावाणिज्यदूत अचिम फैबिग, नॉर्वेच्या महावाणिज्यदूत मोनिका नागेलगार्ड आणि स्वित्झर्लंडचे महावाणिज्यदूत मार्टिन मायेर यांचा समावेश होता.

यावर्षीच्याआयएफएटी इंडिया मध्ये भारतातील अनेक प्रमुख महानगरपालिका आणि नागरी संस्थांनी सहभाग घेतला आहे. बृहत बेंगळुरु महानगर पालिका, सूरत नगर निगम, ग्रेटर विशाखापत्तनम नगर निगम, ग्रेटर मुंबई नगर निगम, दार्जिलिंग नगर निगम, शिमला नगर निगम, लुंगलेई नगर निगम, लेह नगर पालिका समिती, देहरादून नगर निगम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पोर्ट ब्लेयर नगर परिषद आणि केरळचे सुचित्वा मिशन यांचा यात महत्त्वाचा सहभाग आहे. या महानगरपालिका शाश्वत पाणी आणि कचरा व्यवस्थापनाच्या तंत्रज्ञानाचा अनुभव घेऊन त्यांच्या क्षेत्रात लागू करण्याचा प्रयत्न करत आहेत.

उद्घाटन प्रसंगी बीएमसी चे आयुक्त भूषण गगरानी म्हणाले, '' आयएफएटी इंडिया २०२४ मध्ये सादर होणारी तंत्रज्ञानं जागतिक दर्जाची आहेत, ज्यामुळे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील पर्यावरण तंत्रज्ञानाच्या गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील. यापूर्वी, लोकांना अशा नव्या तंत्रज्ञानाचा शोध घेण्यासाठी जगभर प्रवास करावा लागत असे, परंतु आता हे सर्व मुंबईत उपलब्ध झाले आहे. हा सर्वांसाठी मोठा संधीचा मंच आहे, आणि महाराष्ट्र सरकार व नगर निगम याचा पूर्ण लाभ घेणार आहेत.''

मीरा भयंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर यांनीही आपल्या भाषणात सांगितले की, ''जागतिक स्तरावरील अशा भव्य व्यासपीठाचा भाग होणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आम्ही ८५% कचरा विभाजन साध्य केले आहे आणि कचरा वेचकांच्या जीवनमान उन्नतीसाठी देखील काम करत आहोत.''

मेसे म्युनिक इंडिया चे सीईओ भूपिंदर सिंह यांनी उद्घाटनानंतर सांगितले की, ''पहिल्याच दिवशी इतका मोठा




प्रतिसाद मिळाल्याने आम्ही खूप उत्साहित आहोत. आयएफएटी इंडिया २०२४ हा केवळ तंत्रज्ञान प्रदर्शनाचा मंच नाही, तर तो भारताच्या शाश्वततेकडे संक्रमणामागील एक प्रेरक शक्ती आहे.

स्थानिक आणि जागतिक स्तरावरील सहभाग जागतिक पर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्यासाठी सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करतो.'' आयएफएटी इंडिया २०२४ हे भारताच्या पाणी आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आणि नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत विकास साधण्यासाठी एक महत्त्वपूर्ण मंच ठरणार आहे.

## फ्लिपकार्ट होलसेलच्या दिवाळी शॉपोत्सव २०२४ सह मोठा उत्सव साजरा करा

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारतातील होमग्रोन फ्लिपकार्ट ग्रुपच्या डिजिटल बी२बी मार्केटप्लेस, फ्लिपकार्ट होलसेलने त्यांच्या बी२बी सदस्यांसाठी ९ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२४ दरम्यान 'दिवाळी शॉपोत्सव' सेल सुरू करण्याची घोषणा केली. डील्स आपके लिए खुशियां सबके लिए या टॅगलाइनसह, सेल इव्हेंट फ्लिपकार्ट होलसेलच्या सर्व २६ स्टोअर्स आणि ऑनलाइन चॅनेलवर लाइव्ह असेल.

किराणा पार्टनर उत्पादनाच्या सर्व श्रेणीमध्ये उत्तम डील्सचा लाभ घेऊ शकतात. बी२बी सदस्यांना अधिक बचत करण्याची आणि नफा वाढवण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

दिनकर अयिलावरपु, वाइस प्रेसिडेंट आणि ग्रुप हेड ऑफ स्ट्रॅटेजी अँड ट्रान्सफॉर्मेशन, हेड ऑफ फ्लिपकार्ट होलसेल, म्हणाले, ''दिवाळी शॉपोत्सव किराणा सदस्यांना, विशेषत: एसएमई (लहान आणि मध्यम उद्योग) आणि इतर व्यवसाय मालकांना सणासुदीच्या काळात ग्राहकांना सेवा देत असताना जास्तीत जास्त बचत करण्याची आणि नफा वाढवण्याची एक नवीन संधी उपलब्ध करून देतो. अनुकूलित डील आणि ऑफरद्वारे, आम्ही त्यांचा व्यवसाय सुरळीत आणि फायदेशीर पद्धतीने वाढण्यास मदत करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. फ्लिपकार्ट होलसेलमध्ये, आम्ही किराणा इकोसिस्टमसाठी टिकाऊ मूल्य निर्माण करण्यासाठी, त्यांचे कामकाज मजबूत करण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी त्यांना सक्षम करण्याच्या आमच्या वचनबद्धतेवर ठाम आहोत.''

फ्लिपकार्टच्या टॅगलाइननुसार, दिवाळी शॉपोत्सव विविध उत्पादन श्रेणींमध्ये सीझनमधील सर्वात मोठे डील्स ऑफर करण्याचे वचन देतो. या वर्षी फ्लिपकार्ट होलसेल दिवाळीचा उत्सव आणखी खास बनवण्यासाठी विविध श्रेणीतील नॅशनल आणि रिजनल ब्रँड्सवर लक्ष केंद्रित करत आहे. प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिकृत खरेदीचा अनुभव देणासाठी विशिष्ट रिजनल प्राधान्यांची पूर्तता करताना, हे नवीन लॉन्च ऑफर देशभरातील ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहेत.

दिवाळी शॉपोत्सवामध्ये बंपर बक्षिसे असतील, जिथे ग्राहकांना त्यांच्या खरेदीच्या आधारे आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळेल. या सेल अंतर्गत, फ्लिपकार्ट सदस्य हिरो ऑफर्स, फ्लॅट प्राइस स्टोअर, बीओजीओ ऑफर्स आणि इतर आकर्षक ऑफरद्वारे त्याच्या ऑनलाइन चॅनेलवर विविध लाभांचा आनंद घेऊ शकतात.

## भारतातील नोएडामध्ये सीआरसी द फ्लैगशिप साठी हिताचीला ५६ लिफ्ट आणि एस्केलेटरची ऑर्डर प्राप्त!

मुंबई दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- हिताची, लिमिटेड (टीएसई: ६५०१ त्यानंतर हिताचीने आज घोषणा केली की हिताची बिल्डिंग सिस्टम्स कंपनी लिमिटेड (यापुढे हिताची बिल्डिंग सिस्टम्स आणि हिताची लिफ्ट इंडिया प्राइवेट लिमिटेड ), भारतातील लिफ्ट आणि एस्केलेटरची विक्री, स्थापना आणि देखभाल हाताळणारी हिताची लिमिटेड .ची उपकंपनीला सीआरसी द फ्लॅगशिप साठी सीआरसी ग्रुप कडून लिफ्ट आणि एस्केलेटरची ५६ युनिट्सची ऑर्डर भारतामधील नोएडा येथे यशस्वीरित्या प्राप्त झाली आहे. हा प्रकल्प नोएडाच्या सर्वात प्रतिष्ठित व्यावसायिक प्रकल्पांपैकी एक आहे.

ऑर्डरमध्ये १८० किंवा १५० मीटर/ मिनिट वेगाने रेट केलेल्या हाय-स्पीड लिफ्टसह ४४ लिफ्ट, १२ एस्केलेटर आणि डेस्टिनेशन फ्लोअर रिझर्व्हेशन सिस्टीमचा समावेश असून जी लिफ्ट कारचे कार्यक्षमतेने वाटप करते. लिफ्टमध्ये सिस्टीम असून भूकंप ओळखून लिफ्टला ताबडतोब जवळच्या मजल्यावर थांबवते, जेणेकरून प्रवासी अडकून न पडता बाहेर पडू शकतील.

मसाया साकाकिबारा, व्यवस्थापकीय संचालक, हिताची लिफ्ट इंडिया म्हणाले, ''नोएडा जिल्ह्यासाठी या प्रतिष्ठित प्रकल्पात सहभागी झाल्याचा आम्हाला अभिमान आहे आणि आम्ही समाज आणि लोकांचे कल्याण करण्याच्या उद्देशाने सर्व वापरकर्त्यांसाठी सुरक्षित, सुरक्षित आणि आरामदायी वाहतूक देण्यासाठी कायम वचनबद्ध राहू,''. हिताची, लिमिटेड चे कॉर्पोरेट अधिकारी आणि हिताची इंडिया याचे व्यवस्थापकीय संचालक भरत कौशल म्हणाले, ''हिताची इंडिया प्राइवेट लिमिटेड ( हिताची इंडिया ) ची भारतासोबतची नऊ दशकांची भागीदारी अभूतपूर्व वेगाने वाढत आहे अब्जावधी लोकांच्या जीवनाची गुणवत्ता '''' हिताची लिफ्ट इंडिया भारताच्या परिवर्तनाच्या प्रवासात एक अविभाज्य भागीदार आहे आणि सीआरसी समूह देशाच्या लवचिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी वचनबद्ध आहे.'' भारतातील शहरी पायाभूत सुविधा वाढवणे हे केवळ दोन आघाडीच्या संस्थांमधील धोरणात्मक सहकार्यच नाही तर भारताने अनोखे वास्तुशिल्प मानदंड सेट करण्यासाठी आणि एक शाश्वत समाज निर्माण करण्यासाठी एक मोठी झेप घेतली आहे याची खात्री करण्यासाठी आमची नवकल्पना आणि उत्कृष्टतेची दृष्टी अधोरेखित करते. पेमेंट, ई-एज्युकेशन आणि ई-हेल्थकेअरसह आमच्या अनुकरणीय आणि विविध उपायांसह, हिताची इंडिया इकोसिस्टम तयार करण्यासाठी महत्त्वाकांक्षी आणि प्रगतीशील दृष्टीकोन घेत आहे.''

हा प्रकल्प हाती घेऊन, हिताची लिफ्ट इंडिया चे प्रीमियम भारतातील बाजारपेठेतील उपस्थिती आणि व्यवसाय वाढीसाठी वचनबद्ध आहे. सीआरसी द फ्लैगशिप हे २२३,००० चौरस मीटरचे व्यावसायिक केंद्र असून त्यात प्रामुख्याने ४ टॉवर्स आणि एक किरकोळ इमारत आहे. हे ऑफिस स्पेस, किरकोळ दुकाने आणि प्रीमियम सर्व्हिस्ड अपार्टमेंट्स ऑफर करते जसे की को-वर्किंग स्पेस, एक ऑडिटोरियम आणि अगदी पुटिंग गोल्फ कोर्स. भारतीय ग्रीन बिल्डिंग कौन्सिलने पूर्व-प्रमाणित केलेल्या प्लॅटिनम रेटिंगसह हवामान-अनुकूल पायाभूत सुविधा प्राप्त करून प्रकल्पामध्ये त्याच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये २०% पेक्षा जास्त हिरवळ आहे. नोएडा-ग्रेटर नोएडा एक्स्प्रेसवेच्या जवळ स्थित, नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळापासून सुमारे ३५ मिनिटांच्या अंतरावर आहे, जे सध्या बांधले जात आहे आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाला पर्याय म्हणून भारतातील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळांपैकी आहे. सीआरसी ग्रुप हा भारतातील एनसीआर प्रदेशातील एक अत्यंत प्रतिष्ठित विकासक आहे, जो त्याच्या प्रीमियम प्रकल्पांसाठी ओळखला जातो. हा ग्रुप उत्कृष्ट इमारतींचा परिचय करून देऊन रिअल इस्टेट उद्योगाचा दर्जा उंचावण्यासाठी समर्पित आहे , ज्या परिपूर्णता आणि उत्कृष्टतेने परिपूर्ण आहेत आणि पुढेही राहतील.

## पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील २४ गावांना पाणी देण्याचे आश्वासन पूर्ण केले-उपमुख्यमंत्री

सोलापूर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जिल्ह्यातील पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील २४ गावांचा पाण्याचा प्रश्न खूप बिकट बनलेला होता. या २४ गावात दुष्काळी परिस्थिती होती. आपण यापूर्वी या २४ गावांना पाणी देण्याचा शब्द दिलेला होता, तो आज पूर्ण होत असल्याचे समाधान आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केले.

आंधळगाव तालुका मंगळवेढा येथे आयोजित महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे अंतर्गत मंगळवेढा उपसा सिंचन योजना अंतर्गत पंपगृह टप्पा क्रमांक एक, उर्ध्वगामी नलिका क्रमांक एक, शेलेवाडी मुख्य गुरुत्वीय नलिका व त्यावरील वितरण व्यवस्था या कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार सुभाष देशमुख, आमदार राम सातपुते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता डॉक्टर एच टी धुमाळ, भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता ज्ञानेश्वर बागडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील २४ गावातील नागरिकांना व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या गावातील दुष्काळी परिस्थिती संपण्याबरोबरच १७ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचे नियोजन केलेले आहे. शासनाने जलसंपदा विभागाच्या विविध योजना राबवून सोलापूर सांगली व सातारा या तिन्ही जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती संपवली आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपाचे वीज बिल पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे तसेच शेतकऱ्यांना दिवसा १२ तास सातत्यपूर्ण वीजपुरवठा केला जात आहे विज बिल माफ करणारी व दिवसा सिटी पंपांना वीज पुरवठा करणारी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी ही देशातील पहिली कंपनी आहे. सौर कृषी पंप अंतर्गत मागेल त्या शेतकऱ्यांना कृषी पंप दिला जाणार आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा तसेच कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे शासन उभे असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## किनवट/माहुर विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडी कडून प्रा.विजय खूपसे यांना उमेदवारी जाहीर

किनवट दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाराष्ट्र विधान सभा निवडणुकीच्यां तारखा जाहीर झाल्या असतांनाच कीनवट/माहुर विधान सभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार म्हणून मा. प्रा.विजय खूपसे यांना वंचित बहुजन आघाडी पक्षा तर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आली,तसे पाहता प्रा.विजय खूपसे हे उच्च शिक्षित,सुसंस्कृत व समाज सेवेची आवड असणार व्यक्तिमत्व आहे,त्यांचा जन्म अतिशय गरीब कुटुंबामध्ये झालेला असून ते आदिवासी आंध समाज प्रवरगामध्ये मोडतात,त्यांना तरुण वयापासूनच समाज सेवेची आवड असून,गोरगरीब विद्यार्थ्यांची अडले नडले ली कामे करणे,सामाजिक चळवळीत सक्रिय राहणे हे त्यांचे विशेष गुण वैशिष्ट्य,त्यांच्या या सर्व सामाजिक कामाची दखल घेऊनच वंचित बहुजन आघाडी चे सर्वेसर्वा आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांनि त्यांना उमेदवारी बहाल केली,मतदार संघातील लोकांचा दांडगा जनसंपर्क लक्षात घेता कीनवट/माहुर विधान सभा मतदार संघात त्यांचा नीच्छितच विजय होईल असे अनेक अनुभवी व्यक्ती बोलून दाखवत आहेत.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने अर्बन क्रूझर टेसरच्या एक्सक्लुझिव्ह लिमिटेड एडिशन सह फेस्टिव सीजन साजरा केला

बंगळुरू दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सणासुदीच्या उत्साहात भर घालत, टोयोटा किर्लो स्कर मोटर (टीकेएम) ने आज त्यांच्या अत्यंत लोकप्रिय मॉडेल - अर्बन क्रूझर टेसरच्या लिमिटेड एडिशनची घोषणा केली. स्टाइल आणि प्रीमियम-नेस वाढवण्यावर लक्ष केंद्रित करून डिझाइन केलेले हे विशेष एडिशन, ग्राहकांचा आनंद आणि उत्साह वाढवण्यासाठी तयार केलेल्या टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरीज (टीजीए) पॅकेजसह येते.

सर्व टर्बो व्हेरियंटमध्ये उपलब्ध, हे लिमिटेड एडिशन २०,१६० रुपयांच्या सर्वसमावेशक टीजीए पॅकेजसह येते, जे व्हर्सटाईल यूसी टेसरच्या इंटीरियर और एक्सटीरियर दोन्हीचे सौंदर्य वाढवते.

उच्च गुणवत्ता आणि ग्राहकांच्या समाधानाची खात्री करून, सर्व टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरीज डीलरशिपवर प्रमाणित टोयोटा टेक्निशियन कडून फिट केले जातील.

श्री सबरी मनोहर - वाइस प्रेसिडेंट, सेल्स-सर्व्हिस-युज्ड कार बिझनेस - टोयोटा किर्लोस्कर मोटर फेस्टिव्ह एडिशनच्या लाँचवर भाष्य करताना म्हणाले, ''टोयोटामध्ये, आमचे प्रयत्न नेहमीच आमच्या ग्राहकांच्या खास प्रसंगी आणि उत्सवांचा एक भाग बनण्यावर केंद्रित असतात जे आनंददायक, ग्राहक-केंद्रित अनुभव निर्माण करण्यासाठी आमचे समर्पण प्रतिबिंबित करतात. नुकतीच अर्बन क्रुझर हायराइडर फेस्टिव्ह एडिशन सादर केल्यानंतर, आम्ही अर्बन क्रूझर टेसर फेस्टिव्ह एडिशन सादर करण्यास उत्सुक आहोत, जे या सणासुदीच्या हंगामात काहीतरी नवीन आणि रोमांचक आणण्यासाठी डिझाइन केलेले आहे. आम्हाला खात्री आहे की आमच्या ग्राहकांना या नवीन उत्पादनाचा खूप फायदा होईल.''

एप्रिल २०२४ मध्ये लॉन्च झाल्यापासून, अर्बन क्रूझर टेसर हे विशेषत: स्टाइल, कार्यक्षमता आणि अष्टपैलुत्व यांचे मिश्रण शोधणाऱ्या ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. टोयोटाच्या एसयूव्ही हेरिटेजपासून प्रेरित, टेसर मध्ये आकर्षक बाह्य वैशिष्ट्ये आहेत जी प्रतिष्ठेची भावना निर्माण करते, त्याची आकर्षक, एरोडायनामिक आणि बोल्ड डिझाइन फ्रंट ग्रिलने पूरक आहेत.

## पान 1 वरून

### केंद्राने २ महिन्यांत...

जनरल तुषार यांनी जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका झाल्यानंतर राज्याचा दर्जाही बहाल केला जाईल, असे सांगितले होते.

जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा न देणे हे भारताच्या संघराज्याच्या विरोधात असल्याचे याचिकेत म्हटले आहे. विधानसभा निवडणूक शांततेत पार पडली. सुरक्षेची चिंता, स्थानिक हिंसाचार किंवा इतर कोणताही त्रास होण्याची शक्यता दिसत नाही. अशा परिस्थितीत जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा राज्याचा दर्जा देण्यात कोणताही अडथळा नाही. त्यामुळे न्यायालयाने केंद्राला २ महिन्यांत जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे निर्देश द्यावेत, असेही याचिकेत म्हटले आहे..

### तिसरी आघाडी १५० जागा लढणार,...

वाटेल असं सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न करु असे बच्चू कडू म्हणाले. आम्ही चांगले उमेदवार देणार असल्याचे कडू म्हणाले. पवारसाहेब म्हणतात परिवर्तन आणू, तुम्ही कसलं परिवर्तन आणणार आहात? असा सवालही कडू यांनी केला. तुम्ही इतके दिवस सत्तेत होते, मग आता कसं काय परिवर्तन तुम्ही करणार? असा सवालही कडू यांनी उपस्थित केला. परिवर्तनाचा अधिकारी युतीलाही नाही आणि आघाडीलाही नाही. परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार आम्हाला असल्याचे कडू म्हणाले. नवीन परिवर्तन हे खऱ्या अर्थानं कामाचं असेल, बजेटमधील हिस्सा हा सामान्य माणसाचा असल्याचे कडू म्हणाले.

स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार आम्ही या निवडणुकीत देणार असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. आमनच्याकडे छोट्या मोठ्या ३० ते ४० संघटना असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. प्रस्थिपीत लोकांच्या विरोधात लढा देणारे उमेदवार देणार असल्याची माहिती छत्रपती संभाजीराजे यांनी दिली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी माझं बोलणं झालं आहे. पण त्यांनी अद्याप निर्णय घेतला नाही. त्यांनी आमच्यासोबत यावं अशी आमची भूमिका असल्याचे संभाजीराजे म्हणाले. राज्यात आचारसंहिता लागू होऊन तीन दिवस झाले आहेत. त्यामुळं राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे

### बाबा सिद्दिकी हत्या प्रकरण:...

झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर या हत्येची जबाबदारी स्वीकारणारी एक फेसबुक पोस्ट शुबू लोणकर महाराष्ट्र या फेसबूक पेजवरून शेयर करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात होता. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे, अशी माहिती पुढे आली होती. या दृष्टीने पोलीस तपास करत होते.

या तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्या अकोट येथील घरी दाखल झाले. मात्र, घराला कुलूप होतं. शेजाऱ्यांकडे विचारपूस केली असता, दोघेही भाऊ पुण्यात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या पुण्यातील घरी छापा टाकला. त्यावेळी शुभम लोणकर हा फरार असल्याचे त्यांच्या लक्षात आलं. तसेच पोलिसांनी त्याचा भाऊ प्रवीण लोणकरला अटक केली. हे दोघेही बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कटात सहभागी होते. पोलीस आता शुभम लोणकर याचा शोध घेत आहेत. तसंच, मोहम्मद झिशान अख्तर हादेखील हल्ल्याच्या दिवशी मुंबईत नव्हता. पण तो मोबाईलद्वारे आरोपींच्या संपर्कात होता, अशी माहिती आरोपींनी चौकशीत दिली आहे.

### काँग्रेसकडून नांदेड लोकसभेसाठी...

आणि भाजपच्या अजस्त्र ताकदीला धक्का देत विजय खेचून आणणारे काँग्रेसचे आमदार वसंत चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी अकाली निधन झाले होते. त्यांच्या जाण्याने काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला होता. त्यांच्या अचानक जाण्याने वसंत चव्हाण यांची गादी त्यांच्या चिरंजीवानेच चालवावी असे काँग्रेसला वाटत होते. त्यामुळे लोकसभा पोटनिवडणुकीसाठी रवींद्र चव्हाण यांच्या उमेदवारीचा जिल्हा काँग्रेसने ठरावही संमत केला होता. त्यानंतर, आज अधिकृतपणे दिल्लीतील काँग्रेसकडून रविंद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. भाजपमधून नांदेडच्या लोकसभा पोट निवडणुकीसाठी काही नावे समोर येत असून नक्की कोणाला उमेदवारी दिली जाणारी याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### काँग्रेसची पहिली यादी...

वजय वडेट्टीवार म्हणाले की, समजावादी पक्षासोबत चर्चा झाली आहे. त्यांनी काही जागा सांगितल्या आहेत. त्यांच्यासाठी जागा सोडण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. आज आमचे जागा वाटप पूर्ण झाले की त्यांच्या त्यांच्या कोट्यातून जागा वाटपाची पूर्ण तयारी आहे. २१६ जागावर चर्चा झाली आहे. ६६ मतदारसंघावर आमची आज चर्चा सुरू आहे. छोट्या पक्षांकडे दुर्लक्ष केले जात नाही. मुंबईतील जागा वाटपावर आमची चर्चा झाली आहे. त्यांत समाजवादी पक्षालादेखील आम्ही जागा सोडणार आहोत.

### मंगलदास बांदल यांच्या घरावर...

सव्वा कोटींचे कर्ज घेतले आणि त्याची परतफेड न करत एका नागरिकाची फसवणूक केल्याप्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी २६ मे २०२१ रोजी अटक केली होती. दत्तात्रय मांढरे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर बांदल यांच्यावर कारवाई झाली होती. मंगलदास बांदल यांनी फिर्यादी मांढरे यांच्याशी सुरुवातीला मैत्रीचे संबंध निर्माण केले. मांढरे यांच्या नावावर खोटे खरेदी खत करून बांदल यांनी त्या आधारे शिवाजीराव भोसले बँकेतून आठ लाख रुपये कर्ज घेऊन ते स्वतः वापरले. त्यानंतर पुन्हा सदर मिळकतीवर कर्जाकरिता मांढरे यांचे कुलमुकात्यारपत्र व बोगस पुरवणी दस्त करून शिवाजीराव भोसले बँकेतून सव्वा कोटी रुपये कर्ज घेत तेही स्वतः साठी वापरले. त्याचे कर्ज हप्ते अडीच कोटी रुपयापर्यंत गेले आहे. या प्रकरणी फसवणूक झाली म्हणून मांढरे यांनी फिर्याद दिली होती.

### लोकांमध्ये आक्रोष, प्रचंड चीड,...

देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे समाज वेगळ्या मनस्थितीतून जात आहे. समाज ज्या मनस्थितीत जायला नको होता. त्या मनस्थितीत जाण्यासाठी केवळ देवेंद्र फडणवीस यांनी समाजाला भाग पाडलं आहे. आधी जो शेतकरी आणि समाज देवेंद्र फडणवीस यांना सोडून कुठे बाजूला नव्हता. मात्र याच देवेंद्र फडणवीस यांनी जो समाज त्यांच्या बाजूने होता त्याचा मुडदा पाडण्याचं काम केलं. देवेंद्र फडणवीय यांनी असे वार केले की, त्या वारांनी समाजाचं आयुष्य पूर्ण उद्ध्वस्त झालंय, असा गंभीर आरोप जरांगे पाटील यांनी केला.

# १५ वर्षापासून रस्त्यावर पड़लेला कचराकुंडा बंद केला,सुशोभीकरण ही केले



छत्रपती संभाजीनगर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- हम होंगे कामयाब २.० आणि स्टार्ट अ लिटल गुड या मोहिमांच्या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने झोन-७, वॉर्ड ९८ येथे विशेष स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवली. या मोहिमेच्या अंतर्गत हनुमान नगर, गल्ली नं. ०३ नॅशनल मेडिकलसमोर गेल्या १५ वर्षांपासून उघड्यावर कचरा साचणारी जागा (कचरा कुंडी) बंद करून तेथे सुशोभीकरण करण्यात आले. महानगरपालिकेचे मप-आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख श्री. रविंद्र जोगदंड यांच्या आदेशानुसार आणि सहाय्यक आयुक्त तथा वॉर्ड अधिकारी श्री. राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यात स्वच्छता निरीक्षक श्री. सचिन भालेराव, श्री. सचिन खरात, लता राऊत मॅडम श्री. अजय मुथा, अक्षय गणाचार्य (ईकोसत्व व्यवस्थापक), प्रकल्प समन्वयक जितेंद्र भाले, समन्वयक रत्ना सुतार, झोनल अधिकारी सुधाकर खरात, महानगरपालिका जवान आत्माराम दांडगे, मुस्ताक सर, विजय मगरे,किशोर जाधव, जवान भगीरथ सुरडकर, आणि इकोसत्वच्या समिना शेख यांनी मोलाचे योगदान दिले.

या ठिकाणी स्वच्छता करून परिसर सुशोभित करण्यासाठी जीव्हीपी पॉइंटवर रंगकाम करून रांगोळी काढली, झाडांच्या खोडांभोवती गुलाबाच्या रोपांची लागवड करण्यात आली. परिसरात नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस (गट्टू) बसवण्यात आल्या. मनपा स्वच्छता कर्मचारी रहीम शेख विश्वनाथ जोगदंड आणि नागरिकांनी या मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहकार्य केले.

वॉर्डमधील वरिष्ठ नागरिक, जसे की रज्जाक सय्यद, फातूर पटेल, हाजी सरदार पटेल, साजेद पटेल, तसेच चे कार्यकर्ते शकील पटेल, अझीम पटेल, आणि शेख झुबारे यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. या उपक्रमाचा समारोप वृक्षारोपणाने झाला, ज्यात उप-आयुक्त, सहाय्यक आयुक्त, आणि स्थानिक नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. महापालिकेच्या पुढाकाराने आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे, शहरातील स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. कार्यक्रमाची सांगता ''हम होंगे कामयाब'' आणि ''माझा कचरा, माझी जबाबदारी'' अशा घोषणाबाजीने करण्यात आली.

# गोकुळधाम गोशाळेच्या निवारा शेडचे भूमिपूजन

गंगापूर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सन २०१२ ते २०२४ अविरत अखंड गोशाळेच्या कामाचा झालेला संघर्षमय अविरत अखंड असा गोसेवेचा ध्यास पंचक्रोशीतील दानशूर व गोभक्तांच्या आर्थिक मदतीने गोसेवा व गोरक्षणाचे कार्य वटवृक्षाच्या स्वरूपात दिसून येत आहे.

गोशाळेतील गोमाता निवाराशेड चा भूमिपूजन समारंभ गुरुवर्य दादा महाराज वायसळ, बँक मॅनेजर दीपक बांते, संघचालक राजेंद्रजी गोर्डे प्रांत गोसेवा प्रमुख मनीष वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न.

यावेळी प्रास्ताविक व सूत्रसंचालन मनीष वर्मा यांनी केले गोसेवा विषयी आणि गोशाळेतील माहिती व महत्व विशद केले. राज्य शासनातील मंत्रिमंडळाने राज्यातील गोशाळेला निधी उपलब्ध करून दिल्याने या कार्यक्रमात राज्य सरकारचे आभार व्यक्त करण्यात आले.

जिल्हा संघचालक राजेंद्र गोर्डे म्हणाले आपण वाढदिवस अनेक प्रकारे साजरा करतो किंवा आपल्या घरात जे एखादं मोठं कार्य जर असेल तर त्या माध्यमातून आपण ही सेवा करू शकतो आजच्या माध्यमातून आपण हे कार्य सुरू केलं निश्चितच कौतुकास्पद आहे संघात असं म्हटलं जातं की संघ कुछ नही करेंगे कुछ नही छोडेंगा तशा प्रकारचे हे कार्य आहे हे कार्य आपल्याला करायचे कोणी आपल्याला या ठिकाणी मदत करेल न करेल मला हे काम घेतलेले हातात ते करतच राहीले पाहिजे.

गोकुळधाम गोशाळेची व्यवस्था बघून त्यांनीही समाधान व्यक्त केले. दादा महाराज वायसळ म्हणाले,महाराष्ट्र गोसेवा आयोग संचलित गोवर्धन गोवंश योजनेअंतर्गत गोशाळे करता गोशाळा कामाकरता जो काही निधी आपल्याला महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून मिळालेला आहे त्या कामाचं शुभारंभ भूमिपूजन या ठिकाणी आपणा सर्व गोभक्त मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये या ठिकाणी होत आहे गोशाळेतील अनेक अडचणीच्या वेळेस घोषणा घरचे दाग दागिने गहाण ठेवून चारापाणी करावा लागला होता अत्यंत मेहनतीने आज गोशाळा नावारूपास आली असून गोसेवकांच्या हातून गोमातेची सेवा घडत आहे असे ते म्हणाले.

यावेळी प्रांत गोसेवा प्रमुख मनीष वर्मा गोकुळधाम गोशाळा अध्यक्ष चंद्रकांत लांडे उपाध्यक्ष योगेश नाबरिया सचिव श्रीकांत नावंदर सदस्य राधेश्याम कोले गणेश पुराणिक मंगेश शिंदे बालाप्रसाद साबूअतुल रासकर मंगेश जोशी अशोक मंत्री आदींसह गोसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भारतीय दलित पँथरच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करीत असताना बाबासाहेब समजून घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन एड रमेशभाई खंडागळे यांनी केले. एन ७ सिडकोत येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पँथर नेते ऍड रमेशभाई खंडागळे यांच्या हस्ते पुष्प हार अर्पण करण्यात आला. बुध्द वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी लक्षीमन पट्टेबहादर, माधव बिडवे, रत्नाकर खंडागळे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना खंडागळे म्हणाले की, जर आपण बाबासाहेब समजून घेतले तरच आपल्यामध्ये परिवर्तन होईल. अन्यथा आपला उद्धार होणार नाही. बाबासाहेबांनी आपले आयुष्य दलितांच्या उद्धारासाठी वेचले. याचे आंबेडकरी कार्यकर्त्यांनी आत्मपरीक्षण करून बाबासाहेबांनी दिलेल्या मार्गाने चालले पाहिजे. दीक्षाभूमीच्या परिसरात पार्किंगचे चालू झालेले काम एकजुटीने बंद पाडले तसे आंबेडकरी कार्यकर्त्यांनी प्रत्येक ठिकाणी एकजूट दाखवली पाहिजे म्हणजे दलित वस्तीतील बाकडी नजर अन्य ठिकाणी जाणार नाही. त्यासाठी शिक्षण घेऊन उच्चविभूषित झाले पाहिजे असे खंडागळे म्हणाले. यावेळी लक्षीमन पट्टेबहादर यांनीही मारगदर्शन केले.

यावेळी दिशा खंडाळे, सुप्रिया जोंधळे, संजय खरात, अनिल बिऱ्हाडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ३ लाख ६७ हजार शेतकऱ्यांना शून्य वीजबिल

## कृषिपंपांच्या त्रैमासिक वीजबिलांपोटी शून्य रकमेच्या पावत्यांचे वितरण

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार एप्रिल २०२४ पासून राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीजपुरवठा करण्यात येत आहे. या योजनेचा छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील ३ लाख ६७ हजार ६७४ कृषिपंपधारक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या शेतकऱ्यांच्या एप्रिल ते जून २०२४ च्या त्रैमासिक वीजबिलांपोटी राज्य शासनाकडून ३११ कोटी २४ लाख रुपयांची रक्कम प्राप्त महावितरणला प्राप्त झाली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना वीजबिल प्राप्तीच्या पावत्या म्हणजेच शून्य वीजबिलांचे वितरण महावितरणकडून करण्यात आले आहे.

राज्यात महावितरणचे राज्यात ४७ लाख ४१ हजार कृषिपंपधारक वीजग्राहक आहेत. या कृषिपंपांकडून ३९ हजार २४६ दशलक्ष युनिट वार्षिक वीजवापर होतो. शेती मुख्यत्वे पावसावर अवलंबून आहे व अनियमित पर्जन्यमानामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना जाहीर केली आहे. त्याची अंमलबजावणी महावितरणकडून करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार राज्यातील शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीजपुरवठा करण्याचा व त्यासाठी १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान महावितरणला देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार एप्रिल ते जून २०२४ या कालावधीकरिता राज्यातील ४४ लाख ३२ हजार ३९७ शेतकऱ्यांच्या बिलापेटी २७५० कोटी रुपये राज्य शासनाने महावितरणला अदा केले आहेत. ६ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शून्य वीजबिलांच्या पावतीचे वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. तसेच मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांच्या वीजबिलापोटी प्रतिकात्मक धनादेश महावितरणला सुपूर्द केला. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी हा धनादेश स्वीकारला. यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला उपस्थित होत्या.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात कृषिपंपांची ७.५ अश्वशक्तीपर्यंत क्षमता असलेले ३ लाख ६७ हजार ६७४ वीजग्राहक आहेत. योजनेनुसार या ग्राहकांना एप्रिल २०२४ पासून पाच वर्षांपर्यंत मोफत वीजपुरवठा करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे एप्रिल ते जून २०२४ या त्रैमासिक वीजबिलांपोटी राज्य शासनाकडून ३११ कोटी २४ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व शेतकऱ्यांना वीजबिलाची रक्कम प्राप्त झाल्याची पावती वितरीत करण्यात आली आहे. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २ लाख २८ हजार ९३८ ग्राहकांचे १८९ कोटी ३० लाख रुपये व जालना जिल्ह्यातील १ लाख ३८ हजार ७३६ ग्राहकांचे १२१ कोटी ९४ लाख रुपये रकमेचे बिल शासनाने भरले आहे.

# इग्नायटो लर्निंग पॉड्सद्वारे नाथ व्हॅली स्कूलमध्ये विज्ञान कार्यशाळा: शालेय मुलांची जिज्ञासा जागवली

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- इग्नायटो लर्निंग पॉड्सने नुकतीच नाथ व्हॅली स्कूलमध्ये इयत्ता १ ते ५ च्या विद्यार्थ्यांसाठी एक अद्भुत विज्ञान कार्यशाळा आयोजित केली. शाळेच्या प्राचार्या श्रीमती शारदा गुप्ता आणि श्रीमती सरबजीत दास गुप्ता यांच्या प्रेरक मार्गदर्शनाखाली आणि नमिता वैद्य यांच्या उत्कृष्ट समन्वयाने ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी पॅराशूट तयार करणे, एअर रॉकेट बनवणे आणि वॉटर रॉकेट उडवण्याचे प्रयोग आत्मसात केले. या रोमांचक प्रयोगांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड जागवली आणि त्यांनी नवीन गोष्टी शिकण्याचा आनंद घेतला.कार्यशाळेत विद्यार्थ्यांसाठी केवळ विज्ञानाचे शिक्षण नव्हे, तर सर्जनशीलतेचा धडा मिळाला. शिक्षक आणि विद्यार्थी या कार्यशाळेत तल्लीन झाले होते, ज्यामुळे विज्ञान हा विषय केवळ पुस्तकी न राहता अनुभवात्मक बनला. कार्यशाळेने विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा आणि संशोधनाची



भावना जागवली आणि एक अविस्मरणीय अनुभव दिला.

ही प्रेरणादायी कार्यशाळा विवेक राजाराम पातकळ, शुभम चक्रे, पूनम पाटील, प्रीती शर्मा, चैताली चक्रे, दर्शू फुलफगर, आणि ईश्वर सिरसाठ यांच्या समर्पित टीमने यशस्वीरीत्या आयोजित केली.

# रोटरी रेनबोने नवरात्रोत्सवात राबविलेल्या अभियानात ७५ पोती प्लास्टिकचे संकलन

जालना दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- दुर्गा माता नवरात्रोत्सवात रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोने जालना महानगरपालिकेच्या सहकार्याने ९ दिवस प्लास्टिक संकलन अभियान राबविले. या माध्यमातून ७५ पोती प्लास्टिक संकलन करण्यात करण्यात येऊन, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.




नवरात्रोत्सवात जालना येथे दुर्गा माता मंदिर परिसरात मोठी यात्रा भरते. त्यात अनेक छोटी- मोठी दुकाने लागतात. सर्व स्टॉलधारक दुकानदारांना प्लास्टिक रस्त्यावर फेकून न देता वेगळे साठवून ठेवण्याच्या सूचना क्लबतर्फे देण्यात आल्या होत्या. ९ दिवसीय या अभियानात ७५ पोती प्लास्टिक संकलित करण्यात आले. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी क्लबच्या सदस्या डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी विशेष परिश्रम घेतले. सोबतच यात्रेच्या ठिकाणी दर्शनास येणाऱ्या भाविकांसाठी दोन दिवशीय मधुमेह निदान शिबिर घेण्यात आले. त्यात रोटरी इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठीया आणि त्यांच्या टीमने ५७० जणांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

यावेळी क्लबचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा यांच्यासह जयेश पहाडे, पंकज लड्डा, गोपाल मुंदडा, संजय काबरा, कल्पेश भक्कड, संतोष तिवारी, विवेक मणियार आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोडवर बांधकाम मटेरियल २५००० दंड




छत्रपती संभाजीनगर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार व उप आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख रविंद्र जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिक व मालमत्ता धारक यांचेवर सातत्याने दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

आज आयुक्त यांना विश्रामबाग कॉलनी येथून रस्त्यावर बांधकाम मटेरियल टाकून रहदारीस अडथळा निर्माण होत असल्या बाबत फोन वर तक्रार प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीची दखल घेऊन मां.आयुक्त महोदयांनी तत्काळ नागरी मित्र पथक प्रमुख प्रमोद जाधव यांना सबंधित मालमत्ता धारक यांचेवरती दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले. या अनुषंगाने नागरी मित्र पथक प्रमुख प्रमोद जाधव व त्यांचे सहकारी यांनी सबंधित मालमत्ता धारक गणपत काळे यांचे वरती दंडात्मक कारवाई करून २५०००/- रू दंड वसूल केला.

सदर कारवाई उप आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख रविंद्र जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली व नागरी मित्र पथक प्रमुख प्रमोद जाधव यांच्या नियंत्रणात संतोष नावगिरे, गौतम वानखेडे,आत्माराम गवळी, सुवर्णसिंग परदेशी यांनी पार पाडली.

# डोणगाव तांडा नंबर २ येथे बंजारा समाजाचा तीज उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

पैठण दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- तालुक्यातील डोणगाव तांडा येथे बंजारा समाजाचा तीज हा धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष अविनाश जाधव यांच्या पुढाकाराने व नायक अनिल जाधव व कारभारी हिरामण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दिनांक १२ ऑक्टोंबर रोजी हा पारंपारिक आणि धार्मिक असलेला तीज उत्सव साजरा करण्यात आला.

डोणगाव तांडा या गावातील संत सेवालाल महाराज मंदिरापासून तीज उत्सव मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली मंदिरातील संत सेवालाल महाराजाच्या मूर्तीची व मंदिरातील जगदंबा देवी मूर्तीची पूजा आणि आरती डॉ कृष्णा राठोड व सुनिल भाऊ तांबे सरपंच यांच्या हस्ते करण्यात आली डोणगाव तांडा पंचक्रोशी परिसरातील अनेक वस्ती तांड्यावरील बंजारा समाजातील अविवाहित मुलींना व महिलांनी शेकडोंच्या संख्येने पारंपारिक व



धार्मिक वेशभूषेत सहभाग घेतलेला दिसून आला, नवरात्रीच्या पवित्र पर्वावर घटस्थापनेच्या दिवसांपासून हा उत्सव बंजारा समाजामध्ये सुरू होतो आणि विजयादशमी दसऱ्याच्या मुहूर्तावर या तीज उत्सवाची गाजत वाजत मिरवणूक काढून सांगता केली जाते तीज उत्साहात मिरवणुकीची सुरुवात पंचायत समिती सदस्य सुनिल भाऊ तांबे व डॉ कृष्णा राठोड (सामाजिक कार्यकर्ता) लक्ष्मी राठोड मुंबई यांच्या हस्ते तीज परडीचे पुजन करण्यात आले. आणि तिज परडी मध्ये सुनिल तांबे यांच्या स्वखर्चाने प्रत्येकी शंभर रुपये टाकण्यात आले. या प्रसंगी अमोल तांबे, अतुल चव्हाण, संपत चव्हाण, नायक, अनिल जाधव, हिरामण जाधव, हरिचंद्र जाधव, गोपीनाथ जाधव, एकनाथ राठोड, सुभाष जाधव, प्रवीण चव्हाण, प्रकाश जाधव, बंडू जाधव, भरत जाधव, ज्ञानेश्वर चव्हाण, उत्तम राठोड, अतुल जाधव, सतीश जाधव, ज्ञानेश्वर राठोड, पप्पू जाधव, श्रावण राठोड, अजय राठोड, बाबू चव्हाण, दिलीप जाधव, विनोद जाधव, दादासाहेब चव्हाण, दादासाहेब राठोड, मच्छिंद्र जाधव, दिलीप राठोड, प्रताप राठोड, बंटी जाधव, लहू राठोड, प्रताप जाधव व यांनी ही तीच मिरवणुक यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. दुपारी बारा वाजता सुरू झालेल्या या निवडणुक विसर्जन सायंकाळी पाच वाजेपर्यंत डोणगाव तांडा गावाच्या पूर्वीस असलेल्या तलावात तीज धान परडीचे विसर्जन करण्यात आला. या मिरवणुकीमध्ये महिला सौ लक्ष्मी राठोड (मुंबई रिल्स स्टार ), नीलम जाधव, अश्विनी जाधव, संगीता राठोड, सुमन जाधव, प्रियंका जाधव, संगीता जाधव, भाग्यश्री राठोड, मनीषा जाधव, अनिता राठोड, कवराबाई जाधव, कोयल जाधव या कुमारी मुली महिला सह शेकडो बंजारा समाजातील मुली महिला सह मिरवणुकी सहभाग घेतला होता.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४, ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंध

जालना दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. सदर निवडणूकीच्या प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या आवाजातून प्रचार केल्यास ध्वनी प्रदुषण होणे, सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थास बाधा पोहोचण्याची व उशीरा रात्री पर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालु ठेवण्याची शक्यता असल्यामुळे सदर बाबींवर निर्बंध घालणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणूकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकारी यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चीत ठिकाणी ध्वनी क्षेपकाच्या वापरा संबंधीत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील. ध्वनीवर्धकांचा मग ते एका जागी लावलेले असोत किंवा चालत्या वाहनावर बसविलेले असोत, त्यांचा सकाळी ६ पुर्वी किंवा रात्री १० वाजेनंतर आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय करण्यात येऊ नये. संबंधित प्राधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, सार्वजनिक सभा आणि मिरवणुका यांच्यामध्येही ध्वनीवर्धकाचा वापर करण्यात येऊ नये. आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**खाजगी तसेच सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक-२०२४ साठीचा कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत इत्यादीचा संबंधीत जागा मालकाच्या परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

विधानसभा निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासुन आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने निवडणूकीच्या प्रचारासाठी झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहीणे आदी करीता कोणत्याही व्यक्तीची जागा, इमारत, आवार, भिंती इत्यादीवर संबंधित मालकाच्या परवानगी शिवाय व संबंधित परवाना प्राधिकरणाचे परवानगी शिवाय वापर करण्यास निर्बंध घालणे आवश्यक झाले आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये खाजगी व सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**निवडणूकीचे साहित्य सार्वजनिक ठिकाणी, रहदारीस अडथळा होईल असे लावण्यास निर्बंध**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (डीबी) अन्वये निवडणूकीचे साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीची संपुर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक ईमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणूकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट्स, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबीमुळे रहदारीस अडथळा निर्माण होवु शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर निर्बंध घालणे आवश्यक झाले आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**मोटार गाड्या, वाहनांच्या ताफ्याच्या वापरावर निर्बंध जारी**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये कोणत्याही वाहनाच्या ताफ्यामध्ये दहापेक्षा अधिक मोटर गाड्या अथवा वाहने वापरण्यास निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. निवडणूक आयोगाने त्यांच्या निर्देशानुसार कोणत्याही परिस्थितीत सुरक्षेसाठी असलेल्या मोटार गाड्या, वाहने यांच्या ताफ्यात दहा पेक्षा अधिक वाहने नसावीत असे निर्देश दिले आहेत. जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दहा पेक्षा अधिक मोटार गाड्या, वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास प्रतिबंध केला आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**वाहनावर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावण्यासंबंधीच्या नियमाचे आदेश जारी**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठीचा कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासुन आदर्श आधार संहिता अंमलात आलेली आहे. सदर निवडणूकीचे प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे आदिबाबत बंधन घालणे आवश्यक झाले आहे. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजुला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसना मागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजुस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही. हे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध जारी**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आल्याने जालना जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्थेसह सार्वजनिक ठिकाणाच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निर्बंध जारी**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाचे जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये, किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाचे जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालणे आवश्यक झाले आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**शासकीय, निमशासकीय कार्यालयासह विश्रामगृहात सभा घेण्यावर निर्बंध जारी**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ साठी कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. जालना जिल्ह्यात शासकीय , निमशासकीय कार्यालये, संस्था, विश्रामगृहे आदिच्या परिसरात मिरवणूक काढणे, घोषणा देणे, सभा घेण्यावर निर्बंध लावण्यात आले आहेत. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे जालनाजिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या, उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेणे. सदरील आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणूकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटींग्स, होर्डीग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे इत्यादी बाबी नियंत्रीत करणे आवश्यक आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वयेमला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन या आदेशाव्दारे वरील ठिकाणी वरील प्रमाणे कृती करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

**उमेदवारांना नामनिर्देशन दाखल करण्याच्या कार्यपध्दतीचे आदेश जारी**

भारत निवडणूक आयोगानेविधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूकीच्या कालावधीत जालना जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळी वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटार गाड्या, वाहने यांचा समावेश नसावा.

तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील. या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. आदेश दि. १५ ऑक्टोबर रोजीचे ६ वाजेपासुन ते दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजीचे २४ वाजेपर्यंत संपूर्ण जालना जिल्ह्यात अंमलात राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# मानसिक आरोग्य सप्ताहा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

जालना दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- दि. १४ ते १९ ऑक्टोंबर या कालावधीत जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह साजरा केला जातो. या निमित्ताने माईड गुरु फाऊंडेशन आणि संवाद काउन्सलिंग सायकॉलॉजिकल टेस्टिंग वेलनेस सेंटरच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष किशोर आघाम यांनी दिली.




बुधवारी ( ता. १६) रोहणवाडी ता. येथील सुभाषराव ढाकणे महाविद्यालयात "मुलभूत समुपदेशन कौशल्य प्रशिक्षण" यावर समुपदेशन तज्ञ किशोर आघाम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य,विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

मंगळवारी ( ता. १५) संवाद सेंटर येथे ताण- तणाव व्यवस्थापन वर मार्गदर्शन करण्यात आले.तसेच मानसिक आरोग्य जनजागृतीच्या दृष्टीने सलग सहा दिवस ऑनलाईन वेबिनार सिरीज आयोजित करण्यात आली असून मनोविकार आणि मानसिक आरोग्य क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे तर ताण- तणाव व्यवस्थापन -डॉ. अर्चना सिंग ( रायगड), शैक्षणिक ताण आणि विद्यार्थ्यांची मानसिकता डॉ.संयोगिता वर्मा (चंद्रपूर), मुलांचा व्यक्तिमत्व विकास- वंदना सलवदे ( सोलापूर), पती-पत्नी नातेसंबंध डॉ.अमित मेढेकर ( पुणे), कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य डॉ. नितीन शहा, मानसिक आजार समजून घेताना डॉ.प्रकाश आंबेकर (जालना), अशा विविध तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे तसेच जालना शहर आणि जिल्ह्यात स्वयंसेवी समुपदेशकांच्या माध्यमातून शिक्षक प्रशिक्षण, पालकांचे समुपदेशन , आरोग्य परिचारिका विद्यार्थी- विद्यार्थिनींसाठी समुपदेशन कार्यशाळा ,मानसिक आरोग्य जनजागृती व्हिडिओ स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यास कौशल्य, अभ्यासाची सवय, करिअर मार्गदर्शन, परीक्षा तंत्र, मोबाईल, सोशल मीडिया ,व्यसन ताण-तणाव , रागाचे व्यवस्थापन, मैत्री, प्रेम, आकर्षण, मासिक पाळी, गुड टच- बॅड टच, आदी विषयांवर मार्गदर्शन, केले जाणार असून विद्यार्थी पालक शिक्षक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष किशोर आघाम, रवी जाधव, आरती महामुनी ,राधिका कोटस्थाने ,पुनम दबडे, वंदना सलवदे, स्नेहा गचके, माधुरी भुरे ,सरिता माहुलीकर, प्रांजली काळे, सुवार्ता मोहगांवकर, रूपाली परदेशी, जान्हवी चौधरी, विहंगा जोगळेकर ,मयुरी कामठे आदींनी केले आहे.

# तरूणांनी दुरदृष्टी व सकारात्मक विचार करून उद्योग उभारावेत-के. डी. दांडगे

जालना दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मिटकॉन प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या वतीने जालना येथे आज दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी एक दिवशीय उद्योजकता विकास कार्यशाळा घेण्यात आली.यावेळी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन, जालना, व शेख शरीफ डोणगाव यांचें मार्गदर्शन लाभले. या वेळी प्रशिक्षणार्थीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री दांडगे म्हणाले की तरूणांनी दुरदृष्टी व सकारात्मक विचार करून उद्योग उभारले पाहिजे त्यासाठी गरज आहे योग्य मार्गदर्शनाची त्यासाठी या प्रशिक्षणात बारकावे समजून सांगितले.या प्रशिक्षणात सौर ऊर्जा , विद्युत वाहणे,सायबर सुरक्षा,बंदीस्त शेळीपालन, कुकूटपालन,दुग्ध व्यवसाय, जैविक खते, रेशीम उद्योग, दालमिल,विटा तयार करणे, मसाला उद्योग,गृह उद्योग, कांडी कोळसा,शेती पूरक व्यवसाय या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफीस समोर जालना मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस् बँकेच्यावतीने सभासदांना लाभांष वाटप

जालना दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- बँकेच्या न्यु मार्केट यार्ड शाखेत अडतीया असोसिएशन चे अध्यक्ष श्री ओमप्रकाशजी मंत्री प्रमुख अतिथी यांचे स्वागत बँकेचे अध्यक्ष सीए श्री गोपालजी अग्रवाल यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष श्री अनिलजी सोनी, पालक संचालक श्री अंकुशजी राऊत, श्री विरेंद्रजी रूणवाल यांच्या उपस्थितीत सभासदांना प्रतिकात्मक लाभांष वाटप करण्यात आले. यावेळी शाखा सल्लागार श्री नरेशजी गुप्ता, श्री रमेशजी तोतला, श्री नंदकिशोरजी अग्रवाल, श्री निवृत्ती महाराज पाचफुले, श्री गेंदालालजी झुंगे उपस्थित होते.




बँकेचे अध्यक्ष सीए श्री गोपाल अग्रवाल यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना न्यु मार्केट यार्ड येथील सभासद व्यापारी यांचे सहकार्यामुळे शाखा व बँकेची उत्तरो-उत्तर प्रगती झाली आहे व असेच सहकार्य शाखेस मिळत राहील ही अपेक्षा व्यक्त केली. प्रमुख अतिथी श्री ओमप्रकाश मत्री यांनी बँकेची प्रगती व कामकाजा विषयी प्रशंसा केली. व्यापार्यांनी या बँकेत जास्तीत जास्त खाते उघडावी व डिपॉझिट ठेवावीत असे सुचविले.

यावेळी प्रतिकात्मक लाभार्थी म्हणुन सभासद व्यापारी श्री ताराचंदजी कुचेरीया, श्री प्रदिपजी बजाज, श्री जयकुमारजी अग्रवाल, श्री राजेशजी भंडारी, श्री जयलालजी सावजी, श्री राजेंद्रजी भरतीया यांना लाभांषाचा धनादेश मान्यवरांचे हस्ते देण्यात आला. यावेळी श्री परिमल हिस्वनकर, श्री संजयजी कानडे, श्री घोडकेजी, श्री रामेश्वरजी बोडखे, श्री रमेशजी सावजी, श्री हरीरामजी मिसाळ, रविंद्र संचेती , बँकेचे महाव्यवस्थापक श्री राजेंद्र टोकशा उपस्थित होते. श्री नरेंद्रजी अग्रवाल यांनी सुत्र संचलन केले व आभार प्रदर्शन उपाध्यक्ष श्री अनिलजी सोनी यांनी केले.

# परतुर विधानसभा मतदारसंघावर यंदा कॉंग्रेसचा झेंडा फडकण्याची शक्यता...?

## सुरेशकुमार जेथलिया यावेळी आमदार होण्याची चिन्हे; नागरिकांमध्ये चर्चाना उधाण ...!

## परतूर, मंठा, नेर, सेवली विधानसभा मतदारसंघात कॉंग्रेससाठी पोषक वातावरण...

**सागर काजळे**

परतूर दि.१७ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नुकतेच निवडणूक आयोगाने महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीची घोषणा केली. त्या अनुषंगाने सगळेच राजकीय पक्ष आपापल्या परीने कामाला लागल्याचे दिसत आहे. परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये काही वेगळेच दिसत आहे. परतूर विधानसभा मतदारसंघांमध्ये मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया गेल्या पाच वर्षापासून जोमाने कामाला लागल्याचे दिसत आहे. वाड्या - वास्त्या खेडेगाव, मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी पिंजून काढले आहे. जनसामान्यात वावरणारे मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी यावेळी पोषक असे वातावरण निर्माण केले आहे. मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया यावेळी आमदार झाल्याशिवाय राहणार नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. सुरेशकुमार जेथलिया यांनी अहोरात्र जनसामान्य नागरिकांची कामे केलेली आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांच्या मनातील आमदार म्हणून त्यांची छबी तयार केली आहे. सुरेशकुमार जेथलिया यांनी गेल्या पाच वर्षात आपला संपर्क मोठया प्रमाणात वाढवत एक प्रकारे आपली जमेची बाजू पक्की केली आहे. सर्वसामान्य नागरिकांचे सुख दुःखत असो लग्न असो किंवा विकासाची कामे असो तसेच शासकीय कामे असो या कुठल्याही कामात श्री जेथलिया मागे राहिले नाही. म्हणूनच परतूर, मंठा, नेर, सेवली विधानसभा मतदारसंघांमध्ये कॉंग्रेसला पोषक असे वातावरण निर्माण झाले आहे. त्याकरिता यावेळी परतूर, मंठा, नेर, सेवली विधानसभा मतदारसंघावर कॉंग्रेसचा झेंडा फडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. येत्या दोन ते तीन दिवसात मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया यांच्या उमेदवारीची घोषणा होण्याची शक्यता आहे.

मा. आमदार सुरेशकुमार जेथलिया यांच्यावर विश्वास ठेवत मोठ्या प्रमाणात कॉंग्रेसमध्ये कार्यकर्त्यांचा प्रवेश होत आहे. गेल्या पाच वर्षात परतुर, मंठा, नेर, सेवली विधानसभा मतदारसंघांमध्ये कॉंग्रेस पक्षाला तळा-गळात पोहोचण्याचे काम व न्याय मिळून देण्याचे काम मा.



आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी केले आहे. त्यामुळेच कॉंग्रेसमध्ये कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात इनकमिंग होत आहे.

# पीच करते तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत, शरीराला मिळतात आश्चर्यकारक फायदे

आपण आपल्या आरोग्याची खूप काळजी घेणे गरजेचे आहे. कोरोनापासून बचाव करण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जीवनसत्त्व आणि फळांचे तसेच भाज्यांचे सेवन करणे आवश्यक आहे. रोग प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी, पीच फारंच फायदेशीर आहे. पीच जरी उन्हाळ्यात जास्त मिळत असले तरी आजकाल सर्वच ऋतूत सर्व फळे मिळतात. पीच बाहेरून पिवळा आणि लाल रंगाचा असतो. पीचमध्ये बदामासारखे बी असते. पीच हे शरीरासाठी सर्वात फायदेशीर फळांपैकी एक आहे. पीचमध्ये कार्बोहायड्रेट, प्रोटीन, मिनरल्स आणि फायबर चांगल्या प्रमाणात आढळतात. पीचमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. जाणून घ्या तुम्हाला पीचचे कोणते पाच फायदे आहेत.



**पीच खाण्याचे फायदे :**

**१. रोगप्रतिकार शक्ती मजबूत करा** – पीच शरीरात अँटी-ऑक्सिडेंट म्हणून काम करते. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. पीच खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. हंगामी रोग टाळण्यासाठी, तुम्ही फळांमध्ये पीच खाणे आवश्यक आहे.

**२. वजन कमी करा** – पीच हे वजन कमी करण्यासाठी देखील चांगले फळ आहे. पीचमध्ये खूप कमी कॅलरीज असतात. ज्यामुळे तुमचे वजन झपाट्याने कमी होते. नाश्त्यात पीच खाल्ल्यास दुपारच्या जेवणापर्यंत भूक लागत नाही. भूक लागल्यावर तुम्ही पीच खाऊ शकता.

**३. किडनी निरोगी ठेवा** – पीच खाण्याचे इतरही अनेक फायदे आहेत. पीचमध्ये पोटॅशियम असते जे तुमच्या किडनीसाठी खूप फायदेशीर असते. पीच तुमच्या मूत्राशयासाठी साफ करणारे एजंट म्हणून काम करते. पीच खाल्ल्याने किडनीचे आजार होत नाहीत.

**४. डोळ्यांचे आजार दूर** – डोळ्यांची क्षमता वाढवण्यासाठी आणि निरोगी ठेवण्यासाठी पीच खाणे देखील फायदेशीर आहे. पीचमध्ये बीटा कॅरोटीन असते, जे शरीरात व्हिटॅमिन ए बनवते. डोळ्यांतील पडदा निरोगी ठेवण्यासाठी व्हिटॅमिन ए खूप महत्वाचे आहे.

**५. कॅन्सरचा धोका कमी होतो** – पीच खाल्ल्याने कॅन्सरचा धोकाही कमी होतो. पीचमध्ये अँटी-ऑक्सिडेंट असतात जे कॅन्सरपासून तुमचे संरक्षण करतात. केमोथेरपीच्या दुष्परिणामांपासून संरक्षण करण्यासाठी पीच देखील काम करते हे अनेक संशोधनांमध्ये समोर आले आहे.

# रोज किवी खा, विटामिन सीची कमतरता दूर करा



रोज एक किवी खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे मिळतात. हिवाळ्यात रोगप्रतिकार शक्ती मजबूत करण्यासाठी किवीचे सेवन जरूर करा. आज आम्ही तुम्हाला किवीचे फायदे सांगणार आहोत. किवी हे वर्षभर उपलब्ध असणारे फळ आहे. तुम्ही किवी कोणत्याही ऋतूत खाऊ शकता. किवी खाल्ल्याने तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, ज्यामुळे तुमच्यात रोगांशी लढण्याची क्षमता विकसित होते. कोरोनापासून बचाव करण्यासाठी तुमची प्रतिकारशक्तीही मजबूत असली पाहिजे. किवी खायलाही खूप चविष्ट आहे. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आहारात किवीचा समावेश करायला हवा. जाणून घ्या किवीचे फायदे.

**किवी खाण्याचे फायदे**

१. हृदयरोग, ब्लड प्रेशरची समस्या आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठीही किवी खूप फायदेशीर आहे.

२. किवी खाल्ल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते.

३. किवी खाल्ल्याने त्वचा चमकदार होते आणि सुरकुत्या दूर होतात.

४. पोटातील उष्णता आणि अल्सरसारखे आजार दूर करण्यासाठीही किवी हे अतिशय उपयुक्त फळ आहे.

५. किवीमध्ये भरपूर प्रमाणात लोह आणि फॉलिक ॲसिड असते, ज्यामुळे गर्भवती महिलांना खूप फायदे मिळतात.

६. किवी खाल्ल्याने मधुमेह नियंत्रणातही मदत होते. दररोज किवी खाल्ल्याने रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण कमी होते.

७. किवी सांधेदुखी, हाडांचे दुखणे दूर करण्यासाठी देखील उपयुक्त आहे.


८. किवी मानसिक ताण, बॅक्टेरिया आणि व्हायरसचा हल्लाही दूर करते.

**किवीमधील पोषकतत्वे**

किवीमध्ये भरपूर पोटॅशियम असते. किवीमध्ये कॅलरीज खूप कमी असतात, त्यामुळे फिटनेसची काळजी घेणाऱ्यांना किवी खायला खूप आवडते. किवीमध्ये केळीपेक्षा जास्त पोटॅशियम आणि अर्ध्या कॅलरीज असतात. किवीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. यामध्ये संत्र्यापेक्षा दुप्पट व्हिटॅमिन सी असते. किवीमध्ये फायबर असते ज्यामुळे पचनशक्ती वाढते. तुम्ही तुमच्या आहारात किवी फळांचा समावेश केला पाहिजे.

# रात्री उशीरापर्यंत फोन पाहाताय, लवकरच हे गंभीर नुकसान

मोबाईलचे अनेक फायदे आहेत. मात्र मोबाईलचे जितके फायदे आहेत तितके त्याचे तोटेही आहे. मोबाईलने आपलं जीवन खूप सोपं केलंय. पण जास्त वेळ फोन वापरल्यास आरोग्यालाही हानीही पोहोचते. दिवसभर फोन वापरल्यानंतर आपण रात्रीही फोन सोडत नाहीत. मात्र रात्री त्याचा शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. जाणून घेऊया रात्री उशिरापर्यंत मोबाईल चालवण्याचे तोटे.



**ताण वाढतो** – रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरण्याचा परिणाम आपल्या मानसिक आरोग्यावरही होतो. यामुळे थकवा, ताण किंवा तणाव वाढतो. रात्री जास्त वेळ मोबाईल वापरल्याने मेलाटोनिन नावाच्या हार्मोनची पातळी कमी होते. त्यामुळे तणावाची पातळी वाढते. त्याचप्रमाणे दुसऱ्या दिवशीही थकवा जाणवू शकतो.

**डार्क सर्कल** – रात्री उशिरापर्यंत फोनचा वापर केल्यास त्याचा परिणाम त्वचेवरही दिसून येतो. जर तुम्ही रात्री जास्त वेळ फोन वापरत असाल तर तुम्हाला डार्क सर्कलची समस्या निर्माण होऊ शकते. रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरल्याने डोळ्यांवर ताण येतो, त्यामुळे डोळ्यांखालील भागात डार्क सर्कल्स येतात.

**स्नायूंवर परिणाम**– रात्री उशिरापर्यंत फोनचा वापर केल्यास त्याता परिणाम शरीरातील स्नायूंवरही होतो. फोन वापरल्याने डोळ्यांच्या फोकस करणाऱ्या स्नायूंवर वाईट परिणाम होतो. यामुळे तुम्हाला कोणत्याही गोष्टीवर लक्ष केंद्रित करणं कठीण होतं.

**निद्रानाश** – रात्री उशिरापर्यंत फोन वापरल्याने निद्रानाशाच्या त्रासाला सामोरं जावं लागतं. रात्री झोपण्यापूर्वी मोबाईलचा वापर केल्याने मेलाटोनिन हार्मोनची पातळी कमी होते. यामुळे तुम्हाला झोप न येण्याचा त्रास होऊ शकतो. झोपेच्या कमतरतेमुळे तुम्हाला दुसऱ्या दिवशी थकवाही जाणवण्याची शक्यता आहे.

**बुद्धीमत्तेवर परिणाम**– रात्री उशिरापर्यंत फोन वापरल्यामुळे मेंदूवरही परिणाम होतो. फोन जास्त वेळ वापर केल्याने मेमरी कमकुवत होऊ शकते. एवढेच नाही तर मेंदूचे आजारही होऊ शकतात. जेव्हा आपण रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरतो तेव्हा त्याचा परिणाम थेट आपल्या मेंदूवर होतो. यामुळे तुम्हाला अनेक समस्या निर्माण होण्याचा धोका असतो.

# कोबीमध्ये असते दूधाइतके कॅल्शियम

चायनीज भेळ असो वा मंचूरियन भजी, सगळ्यामध्येच महत्त्वाचा घटक आहे तो म्हणजे कोबी. हल्ली बऱ्याच स्ट्रीट फूडमध्ये सॅलड म्हणून कच्चा कोबी दिला जातो. भाज्या बनवण्यासोबतच सॅलड, सूप आणि चायनीज पदार्थांमध्येही याचा वापर केला जातो. अनेकदा आपल्यापैकी बरेच लोक तो कोबी फेकून देतात किंवा इतर कोणत्याही प्रकारे खाणे टाळतात. तुम्ही देखील अशांपैकीच एक असाल, तर थांबा! या आधी कोबीच फायदे जाणून घ्या...


* कोबीमध्ये दुधाइतकेच लोह, पोटॅशियम आणि कॅल्शियम असते. अशा परिस्थितीत, सर्व समस्यांमध्ये तो उपयुक्त आहे.

* पोटाच्या समस्यांवरही आराम देण्याचे काम कोबी करतो. यामुळे पचनशक्ती वाढते आणि पोटदुखी दूर होते. पोटातील जंतांची समस्याही याच्या सेवनाने दूर होते.

* ज्यांना वजन कमी करायचे आहे, त्यांनी आहारात कोबीचा समावेश करावा. शिजवलेल्या कोबीमध्ये फक्त ३३ कॅलरीज असतात. ज्यामुळे तुमच्या शरीराला भरपूर ऊर्जा देखील मिळते आणि शरीरात चरबी जमा होत नाही. तुम्ही ते सूप, भाज्या, सॅलडच्या स्वरूपात खाऊ शकता.

* कोबीमध्ये लोह आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात असते. अशा परिस्थितीत ते शरीरातील रक्ताची कमतरता दूर करते, तसेच रक्त देखील शुद्ध करते. पोटॅशियम हा घटक रक्तदाब आणि हृदयाशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त आहे.

* जर, तुम्हाला सतत स्नायू दुखीचा त्रास होत असेल, तर कोबी तुम्हाला या समस्येपासून आराम देऊ शकतो. त्यात लॅक्टिक ॲसिड नावाचा घटक असतो, जो स्वतः नैसर्गिक वेदनाशामक म्हणून काम करतो.



* कोबीमध्ये पॉलिफेनोल्सचा एक घटक असतो, जो हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करतो. कोबी शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी देखील नियंत्रित करू शकतो.

* कोबी हा व्हिटॅमीन 'के'चा उत्तम स्त्रोत आहे. व्हिटॅमीन 'के' मेंदूच्या नसांचे आरोग्य सुधारतो. त्यामुळे कोबीचे सेवन तुमच्या मेंदूलाही सक्रिय ठेवतो.

# पिंपल्सच्या समस्येवर गुणकारी कापूर, इतरही अनेक फायदे

कापूर पुजेच्या वेळी वापरला जातो, त्यामुळे वातावरण शुद्ध होते. कापूरमध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आरोग्यासोबतच आपले सौंदर्य वाढवण्यासाठी खास काम करतात. वेदना, सर्दी किंवा इतर आरोग्य समस्या बरे करण्यासाठी फायदेशीर असलेल्या बाम, मलम यासारख्या गोष्टी बनवण्यासाठी याचा वापर सामान्यतः केला जातो. तसेच, त्वचेशी संबंधित समस्यांवरही हा एक उत्तम घरगुती उपाय आहे. कापूर त्वचेला चमकदार करण्यासोबतच अनेक समस्या दूर करण्यातही मदत करतो.



**मुरुमांच्या समस्येसाठी कापूरचा वापर**

मुरुमांची समस्येसाठी कापूरचा छोटा तुकडा घेऊन त्याची पावडर बनवा. आता त्यात ऑलिव्ह ऑईल मिसळा आणि मुरुमांवर लावा. काही वेळ चेहऱ्यावर लावल्यानंतर स्वच्छ करा. ही पद्धत काही दिवस वापरून पाहा.

**तेलकट त्वचेसाठी फेस पॅक**

तेलकटपासून मुक्ती मिळवण्यासाठी कपूरची पावडर, मुलतानी माती, बेसन किंवा तांदळाचे पीठ यामध्ये गुलाब पाणी मिसळून फेस पॅक तयार करा. हे चेहऱ्यावर लावा आणि १० मिनिटे राहू द्या. चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल काढून टाकण्याबरोबरच, हे उघडे छिद्र कमी करण्यासाठी उपयुक्त मानले जाते. तुमचा चेहरा पूर्वीपेक्षा अधिक तजेलदार दिसेल.

**भेगा पडलेल्या टाचांपासून सुटका**

हिवाळ्यात टाचांना भेगा पडल्याचा त्रास होत असेल तर यासाठी तुम्ही कापूर वापरू शकता. यासाठी कोमट पाण्यात कापूर मिसळा आणि या पाण्यात काही मिनिटे पाय बुडवून ठेवा. यानंतर ब्रश किंवा लूफाच्या मदतीने थोडा वेळ स्क्रब करा. आता तुमचे पाय चांगले धुवा आणि त्यावर फ्रूट क्रीम किंवा तेल लावा. तुम्हाला फरक दिसेल.

**त्वचेची जळजळीची समस्या दूर होईल**

हिवाळ्यात आंघोळ केल्यावर किंवा अनेक वेळा ओले कपडे घातल्याने त्वचेला खाज सुटणे सुरू होते. यासाठी तेलात थोडा कापूर मिसळा. आता सामान्य तेलाप्रमाणे हात आणि पायांना लावा. बॉडी लोशन बनवण्यासाठीही कापूर वापरला जातो. यामध्ये असलेले अँटीसेप्टिक आणि अँटी प्र्युरिटिक गुणधर्म त्वचेच्या जळजळीवर फायदेशीर मानले जातात.

***



# या पद्धतीने सफरचंद खाणं आरोग्यासाठी चांगलं, जाणून घ्या माहिती

प्रत्येक लोकांनी चांगल्या आरोग्यासाठी दिवसाला एक तरी फळ खावं असे डॉक्टर सांगतात. यासगळ्यात सफरचंद खाण्यासाठी डॉक्टर सांगतात. तुम्ही हे देखील ऐकलं असेल की, दररोज एक सफरचंद खाल्ला तर तुम्हाला कधीही डॉक्टरकडे जाण्याची गरज लागणार नाही. त्यामुळे नेहमी नाही जमत नसलं, तरी लोकं सफरचंद खातात. परंतु सफरचंद खाण्याची योग्य पद्धत तुम्हाला माहितीय का? आता तुम्ही म्हणाल की, यात कोणती आली पद्धत?

अनेक लोकांना साल सोलून सफरचंद खाण्याची सवय असते. असं सफरचंद खाल्याने ते चवीला लागते. असे अनेक लोकांचे म्हणणे आहे. परंतु तज्ज्ञांच्या मते साल काढलेले सफरचंद खाऊ नये. सफरचंदाच्या सालीमध्ये असे अनेक पोषक तत्व असतात जे आरोग्याच्या समस्या दूर करतात. सफरचंदाचे सालीसोबत सेवन करणे अधिक फायदेशीर ठरेल.

सफरचंदांमध्ये प्रथिने, चरबी, फायबर, कार्बोहायड्रेट, कॅल्शियम, लोह, साखर, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, सोडियम, जस्त, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी ६, व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन ई सारखे अनेक पोषक घटक असतात. या सर्व गोष्टींचा फायदा तुम्हाला तेव्हाच मिळेल जेव्हा तुम्ही ते सालीसोबत खाल.

**दुधासोबत खाणे फायदेशीर आहे**– सफरचंद दुधासोबत खाल्ल्याने अनेक फायदे आहेत. नाश्त्यात सफरचंद दुधासोबत खा. यामुळे पोटाशी संबंधित समस्या दूर होतील.

**सफरचंद खाण्याची सर्वोत्तम वेळ** – सफरचंदातील पोषक तत्वांचा फायदा घ्यायचा असेल तर रिकाम्या पोटी सफरचंद खा. रात्री सफरचंद खाऊ नका. सफरचंदात कॅफिन आढळते. याचा झोपेवर नकारात्मक परिणाम होतो. दिवसातून एक सफरचंद किंवा अर्धे सफरचंद खा. परंतु त्यापेक्षा जास्त त्याला खाऊ नका. जास्त प्रमाणात सफरचंद खाल्ल्याने घसा, जीभ, ओठ आणि चेहऱ्याला सूज येऊ शकते.

**धुतल्याशिवाय खाऊ नका**– सफरचंद धुतल्याशिवाय खाऊ नका. कधीकधी सफरचंद चमकण्यासाठी ब्लीचचा किंवा वॅक्सचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत तुम्ही सफरचंद न धुता खाल्ल्यास नुकसान होऊ शकते. यासाठी तुम्ही सफरचंद ३० मिनिटे कोमट पाण्यात ठेवा.

# केवळ चविष्ठच नाही, तर आरोग्यदायीही 'आल्याचा मुरांबा'

आरोग्याच्या दृष्टीने आल्याचे अनेक फायदे आहेत. आले पचन सुधारते, सर्दीच्या प्रभावापासून संरक्षण करते, खोकला-सर्दी आणि घसा खवखवणे यासारख्या समस्यांपासून आराम देते. यामुळेच लोक हिवाळ्यात चहामध्ये किंवा जेवणामध्ये आले वापरतात. पण, अनेकांना आल्याची चव आवडत नाही. अशा लोकांना आल्याचे फायदे मिळवून देण्यासाठी तुम्ही आल्याचा मुरांबा बनवू शकता.

आल्याचा मुरंबा खायला खूप चविष्ट असतो आणि शरीरातील सर्व समस्या दूर करण्यासाठी देखील उपयुक्त मानला जातो. हिवाळ्यात दम्याच्या रुग्णांसाठी देखील आल्याचा मुरांबा लाभदायी आहे. तुम्ही देखील हा खास पदार्थ बनवण्याचा विचार करत असाल, तर ही रेसिपी नक्की ट्राय करा.



**आल्याच्या मुरंब्यासाठी साहित्य** आल्याचा मुरांबा अवघ्या अर्ध तासात बनणारा पदार्थ आहे. शिवाय यासाठी जास्त साहित्यही आवश्यक नाही. १ किलो आल्याचा मुरांबा बनवण्यासाठी आले, १ किलो साखर, २० ग्रॅम वेलची पावडर, १० मिली गुलाबपाणी आणि एक लिंबू आवश्यक आहे.

**कसा बनवाल आल्याचा मुरांबा?**

* सर्वप्रथम आले धुवून त्याची साल काढा. यानंतर आल्याचे छोटे छोटे तुकडे करा. आता गॅसवर एक खोलगट पॅन ठेवा, त्यात एक ग्लास पाणी आणि साखर घाला.

* पाणी आणि साखर व्यवस्थित उकळू द्या आणि त्याचा पाक बनू द्या. आता दुसरे भांडे घ्या आणि त्यात आले उकडून घ्या. यानंतर आल्याचे तुकडे तयार पाकात टाका आणि व्यवस्थित मिक्स करा.

* नंतर त्यात वेलची पावडर, लिंबू, गुलाब पाणी मिसळून मंद आचेवर शिजवा. नीट शिजल्यावर, थंड करून काचेच्या डब्यात भरून ठेवा आणि हवा तेव्हा त्याचा आस्वाद घ्या.

**आल्याच्या मुरांब्याचे फायदे :**

आले गरम प्रभावाचा असते, म्हणून खोकला, सर्दी दरम्यान तुम्ही ते खाऊ शकता. याशिवाय गॅस, अपचन, मळमळ आदी समस्यांमध्येही याचे सेवन केल्यास आराम मिळतो. शिवाय आपण सँडविचमध्ये स्प्रेड, जाम म्हणून देखील यांचा वापर करू शकता.

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

# ग्लोबल भारत

संपादक – शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा 'ग्लोबल भारत'







मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com